cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१६० | मंगळवार दि.१ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### विकृत आनंदाला पायबंद !

चाईल्ड पोर्नोग्राफी संदर्भात मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निकाल रद्द ठरवून सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत जो ताजा निकाल दिला आहे त्याने या संदर्भातील कायद्याच्या तरतुदींमध्ये पळवाटा शोधणाऱ्यांना जोरदार दणका बसला आहे. चाईल्ड पोर्नोग्राफी हा 'पॉक्सो' व माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हाच मानला जावा, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे अशी चित्रे किंवा लैंगिक शोषणाची सामग्री असणाऱ्या फिल्म बघणेही गुन्हा आहे याची जाणीव सर्वांना नक्कीच होईल, अशीच अपेक्षा आहे. मी माझ्यापुरते माझ्या मोबाईलवर व्हीडीओ बघतो, त्याचा कुणाला काय त्रास?

### अमेरिकेकडून यावर्षी २.५ लाख नवीन व्हिसा जारी

नवी दिल्लीः अमेरिकेने या वर्षी पुन्हा एकदा भारतासाठी विक्रमी संख्येने व्हिसा जारी केले आहेत. अमेरिकन दूतावासाने सोमवारी (दि.३०) अधिकृत एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, पर्यटक, कुशल कामगार आणि विद्यार्थ्यांसह भारतीय प्रवाशांसाठी २५०,००० अतिरिक्त व्हिसा जारी करण्यात आले आहेत. भारतातील यूएस दूतावासाने पर्यटक, कुशल कामगार आणि विद्यार्थ्यांसह भारतीय प्रवाशांसाठी अतिरिक्त २५०,००० व्हिसा अपॉइंटमेंट बाजूला ठेवल्या आहेत. नुकतेच जारी करण्यात आलेले नवीन स्लॉट लाखो भारतीय अर्जदारांना त्यांचा व्हिसा वेळेवर मिळण्यास मदत करतील. त्यामुळे प्रवासाची सोय होईल. अमेरिका सरकारच्या या निर्णयामुळे युएस–भारत संबंधांना नवीन उभारी मिळेल, असे देखील भारतीय अमेरिन दूतवासाने म्हटले आहे.

# कापूस-सोयाबीन अनुदानापोटी राज्यातील ४९ लाख शेतकऱ्यांना मिळाले २३९८ कोटी

## मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीदरम्यान लाभाचे वितरण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतुन आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना



अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात करण्यात आली. याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर च्या मर्यादेत रक्कम ◀◀ पान २ वर

### उपमुख्यमंत्री अजित दादा आज परळीत

परळी वै : लाभ आणि बळ' हे ब्रीद महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी घेऊन जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने सबंध महाराष्ट्रात फिरत असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेचे वादळ उद्या मंगळवार, दि.०१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्याच्या परळी शहरात धडकणार आहे.

लाडक्या बहिणींच्या सशक्तिकरणाच्या दृष्टीने तसेच परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींशी व नागरिकांशी संवाद साधण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना.अजितदादा पवार यांसह प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, महिला व बालविकास मंत्री कु.आदीतीताई तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर, आ.प्रकाशदादा सोळंके, आ.बाळासाहेब आजबे काका, मा.आ.अमरसिंह भैय्या पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, मुख्यमंत्री माझी लाडकी ◀◀ पान २ वर

### परळी मतदारसंघास आणखी एक गिफ्ट!

मुंबई : बीड जिल्ह्यातील मौजे वडखेल ता. परळी येथे २९.५० हेक्टर क्षेत्रात सीताफळ इस्टेट स्थापन करण्यास आज सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी ५४ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली असून धनंजय मुंडे यांनी सर्वात जास्त सीताफळ उत्पादन होणाऱ्या बीड जिल्ह्यात व त्यांच्या परळी मतदारसंघास या माध्यमातून आणखी एक महत्वाचे गिफ्ट दिले आहे. बीड जिल्ह्यात बालाघाट डोंगर रांगेत मोठ्या प्रमाणात सीताफळाचे ◀◀ पान २ वर

## अहवाल सकारात्मक नसला तर विरोधात भुमिका घेणार

### शिंदे समितीच्या अहवालावर मनोज जरांगे यांचा राज्य सरकारला पुन्हा इशारा



**जालना । प्रतिनिधी**

**मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारने नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अहवालावर प्रतिक्रिया दिली. या समितीचा अहवाल सकारात्मक नसला तर आपण राज्य सरकारच्या विरोधात भूमिका मांडणार असल्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. तसेच समितीच्या अहवालात काय–काय असले पाहिजे? याबाबत मनोज जरांगे यांनी भाष्य केले आहे.**


निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने जो अहवाल सादर केला आहे तो सरकारने काही ओपन केलेला नाही. त्यामुळे त्या अहवालामध्ये काय आहे हे आपण सांगू शकत नाही. शिंदे समिती ही नोंदी तपासण्यासाठी आहे. मराठा समाज कुणबी कसा आहे, मराठा कुणबी एकच आहे, हैदराबाद गॅजेटमध्ये राज्यातील मराठा समाजाबद्दलचे असणारे अनेक पुरावे आहेत, राज्यातील जनगणना १८८४ च्या अगोदरचे गॅजेट या सर्वांचा सर्वच विषयांचा ◀◀ पान २ वर

#### सरकारच्या बैठकीवर जोरदार टिका

जे आंदोलनाला विरोध करतात ते बैठकीला बोलावतात, गोरगरिबांच्या नादी लागणे सरकारला परवडत नाही, कितीही खोटारड्या बैठका घ्या. जे लोक प्रक्रियेत नाहीत आणि त्यांना तुम्ही घेऊन छाती बडविणार असाल तर हे सरकार असू शकत नाही आणि तो अहवाल पण चुकीचा दिला असावा आणि बैठकही चुकीची. लोकं तुमची, नाटकं तुमची आणि बघणारी जनता बाजूला. जर तुम्ही आरक्षणाला विरोध करणाऱ्याला घेऊन काम केले तर तुम्हाला धडा शिकवणार, असा मोठा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला.

## ३० लाख मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळणार?

### मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती; शिंदे समितीला १ लाख ७७ हजार नोंदी सापडल्या



**मुंबई । प्रतिनिधी**

**शिंदे समितीला सापडलेल्या नोंदीनुसार राज्यातील जवळपास ३० लाख मराठा समाजाच्या नागरिकांना कुणबी नोंदी मिळू शकणार आहेत. सरकार सकारात्मक आहे. १८८२ ची वैयक्तिक कुणबी नोंद सापडली तरी कुणबी आरक्षण मिळणार आहे. सरकारने नेमलेल्या निवृत्त न्यायाधीश शिंदे समितीला अशा एकूण १ लाख ७७ हजार नोंदी मिळाल्या आहेत. त्यामुळे अशी नोंद ज्यांची मिळाली आहे, त्यांचे इतर नातेवाईक ३०० जरी पकडले तर ३०० गुणले १ लाख ७७ हजार नोंदी केले तर ३० लाख नोंदी होतात, असे गणित चंद्रकांत पाटील यांनी मांडले आहे.**

मराठा आरक्षण उपसमितीची सोमवारी अतिशय ◀◀ पान २ वर

#### बैठकीत मनोज जरांगे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न

आम्ही आज मराठा आरक्षणासाठी काम करणारे अनेक संघटनांचे नेते, ज्यात मनोज जरांगे पाटील यांना सुद्धा संपर्क केला. ते आजारी असल्यामुळे फोनवर आले नाहीत. पण त्यांच्या वतीने एक सरपंच महोदय येत होते. त्यांनी म्हटलं की, आताच्या त्यांच्या तब्येतीमुळे त्यांना येता येणार नाही. पण आम्ही एक नोट पाठवतो. ती नोटसुद्धा आजच्या बैठकीत आम्ही वाचून दाखवली. त्याअर्थाने त्यांचे सुद्धा म्हणणे त्या बैठकीत आले, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

#### निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या अहवालात काय?

शिंदे समितीच्या अहवालात कुणबी सर्टिफिकेट मिळवण्यासाठी सोप्या पद्धतीने काय करता येईल, याचा अहवाल दिला. तो अहवाल मंत्रिमंडळाने मान्य केला. त्याबाबत आता जीआर निघेल. त्यांनी ऑलरेडी टप्प्याटप्प्यावर खूप गोष्टी सोप्या केल्या. आधी १० पुराव्यांच्या आधारावर कुणबी प्रमाणपत्र मिळायचे. आता ४२ पुराव्यांच्या आधारी कुणबी प्रमाणपत्र मिळणार आहे, अशी माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.

#### सरसकट कुणबी प्रमाणपत्र का देता येणार नाही?

हैदराबाद गॅझेटमध्ये, किंवा सातारा किंवा त्र्यंबकेश्वर गॅझेटमध्ये नोंदी या गठ्ठ्याने किंवा समूहाने आहेत. त्यामुळे समूहाने असलेल्या नोंदीवर तुम्हाला समूहाने कन्वर्ट करता येत नाही. १८८२ मध्ये मराठा समाज कुणबी होता, १९०२ मध्ये कुणबी होता, पण १९२२ पासून तो मराठा मराठा लिहायला लागला. त्यामागे तेव्हाची काही सामाजिक कारणे आहेत. त्यावेळेला काही नोंदी कुणबीच्या नोदीं मराठा झाल्या. १८८२ ची सापडेली नोंद आम्ही मान्य करायला तयार आहोत. पण त्याला वंशावळ सिद्ध करावी लागेल. इनडीविजवल नोंद मान्य करावी लागेल, असा खुलासा चंद्रकांत पाटील यांनी केला.

### राज्यात झिका वाढतोय

मुंबईः राज्यात आजपर्यंत १३० झिका रुग्ण असून सर्वाधिक रुग्ण पुण्याच्या मनपा क्षेत्रात आहेत. आता मुंबईतही याचा शिरकाव झाला असून, दादरमध्ये एक रूग्ण आढळल्याने मुंबई महापालिका आरोग्य विभागा अलर्ट मोडवर आला आहे. दरम्यान झिकाचा धोका गर्भवती ◀◀ पान २ वर

## अतिवृष्टीची अवघ्या १० शेतकऱ्यांना मदत

### कृषीमंत्र्यांच्याच जिल्ह्यात शेतकऱ्यांना मदत मिळेना

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली, त्यात बीड जिल्ह्यात सुध्दा पिकांचे मोठे नुकसान झाले असताना सुध्दा अवघ्या १० शेतकऱ्यांना ही मदत मिळणार असल्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याच जिल्ह्यात मदतीसाठी शासनाकडून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याची बा समोर आली आहे.**

राज्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाली असून १ लाख ८३ हजार ९०७ शेतकऱ्यांन नुकसान भरपाई दिली जाणार या अतिवृष्टीच्या मदतीत बीड जिल्ह्यातील १० शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असताना प्रत्यक्षात ७.८ हेक्टरवर अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याचा प्रशासनाने जावई शोध लावल्याचे दिसत आहे. त्यापोटी २ लाख ८० हजार रक्कम त्या शेतकऱ्यांना मिळणार आहे. ◀◀ पान २ वर

## लोकसभा निवडणुकीतील विरोधाचा वचपा ओबीसी समाज विधानसभेमध्ये काढणार!

### वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन आघाव यांचा खणखणीत इशारा

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीची लढत अटीतटीची झाली. या निवडणुकीतून बीडसह राज्यभरातील ओबीसी समाजाचे प्रमुख नेतृत्व संपण्याचा प्रयत्न झाला. अनेक ठिकाणी धर्म, जातीवादाला बळी पडत ओबीसी नेत्यांच्या विरोधात स्थानिक नेत्यांनी विनाकारण भूमिका घेतल्या. लोकसभा निवडणुकीतील ओबीसी विरोधाचा वचपा आता विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाकडून काढला जाईल, असा खणखणीत इशारा वंजारी सेवा संघाचे ◀◀ पान २ वर



#### मुस्लिम समाजातील 'त्या' नेत्यांची होणार पंचाईत

लोकसभा निवडणुकीवेळी मोदींविरोधात मुस्लिम समाजात एकप्रकारे लाट निर्माण झाली होती. त्या लाटेच्या नावाखाली महायुतीशी संबंधित अनेक मुस्लिम नेत्यांनी घरात बसून तटस्थ भूमिका घेतली. त्यांना आता मुस्लिम समाज साथ देईल का? ऐन निवडणुकीच्या तोंडावर मुस्लिम समाज उघड–उघड बोलू लागल्याने भावी आमदारांची पंचाईत होणार हे मात्र नक्की. अशा नेत्यांपासून देखील ओबीसी समाजबांधवांनी सावध रहावे, असे आवाहन श्री.आघाव यांनी पत्रकातून केले आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ५.०० क्विंटल | २,५०० | २,७७५ | २,६२४ |
| ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल | १,८०० | २,७०० | २,१३३ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : १०६.०० क्विंटल | ५,७६० | ७,२५१ | ६,४८९ |
| बाजरी :२२.०० क्विंटल | २,३०० | २,५०० | २,३८७ |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६०१ | ७,३११ | ७,००३ |
| सोयाबीनः३९७.५० क्विंटल | २,९०० | ४,५८१ | ३,९०४ |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,००० | ७,५०० | ६,२५३ |

## अजितदादांच्या जनसन्मान यात्रेस हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा

### आ.प्रकाश सोळंके,जयसिंग सोळंके यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांची माजलगाव येथे मंगळवार दि.१ऑक्टोंबर रोजी जनसन्मान यात्रा येणार आहे. त्यानिमित्त सकाळी दहा वाजता मंगलनाथ मैदान येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या जनसन्मान यात्रेस हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.प्रकाश सोळंके व माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.**





महायुती सरकारने राज्यात जनहिताच्या अनेक योजना राबवल्या आहेत.या सर्व योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्या साठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी संपूर्ण राज्यात दौरा काढलेला आहेत.त्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघात जनसन्मान यात्रा मंगळवार दि.१ऑक्टोंबर रोजी येत आहेत.यावेळी ना.अजित पवार यांच्या स्वागतासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे.यानंतर मंगलनाथ मैदान येथे सकाळी दहा वाजता जाहीर सभा होणार आहे.या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत ◀◀ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# विकृत आनंदाला पायबंद !

चाईल्ड पोर्नोग्राफी संदर्भात मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निकाल रद्द ठरवून सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत जो ताजा निकाल दिला आहे त्याने या संदर्भातील कायद्याच्या तरतुदींमध्ये पळवाटा शोधणाऱ्यांना जोरदार दणका बसला आहे. चाईल्ड पोर्नोग्राफी हा 'पॉक्सो' व माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हाच मानला जावा, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे अशी चित्रे किंवा लैंगिक शोषणाची सामग्री असणाऱ्या फिल्म बघणेही गुन्हा आहे याची जाणीव सर्वांना नक्कीच होईल, अशीच अपेक्षा आहे. मी माझ्यापुरते माझ्या मोबाईलवर व्हीडीओ बघतो, त्याचा कुणाला काय त्रास? मग असे व्हीडीओ वा साहित्य पाहणे यात गुन्हा कसला? असाच समज समाजात दृढ आहे. त्यातूनच मग कायद्यात पळवाटा शोधल्या जातात. मद्रास उच्च न्यायालयानेही या तरतुदींचा अर्थ लावताना चाईल्ड पोर्नोग्राफीचे साहित्य एखाद्याकडे असणे हा गुन्हा नाही तर असे साहित्य दुसऱ्याला प्रसारित करणे किंवा व्यावसायिक कामासाठी वापरले जाणे हा गुन्हा आहे, असे आपल्या निकालात मत व्यक्त केले.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाने कायद्यातील तरतुदींचा लावलेला अर्थ चुकीचा असल्याचे स्पष्ट करत लहानग्यांचा समावेश असलेले, त्यांच्याशी संबंधित किंवा त्यांच्यावरील लैंगिक अत्याचाराचे चित्रीकरण पाहणे, बाळगणे व प्रसारित करणे हा पॉक्सो कायद्याअंतर्गत गुन्हाच असल्याचे स्पष्ट केल्याने याबाबतच्या पळवाटांना आता पायबंद बसण्याची आशा निर्माण झाली आहे. चाईल्ड पोर्नोग्राफीची निर्मिती करणारे या पळवाटांमुळे कायद्याच्या कचाट्यात सापडत नाहीत. दुसरीकडे यात सहभागी व्यक्ती पैशापोटी हे कृत्य करत असतात. अनेकदा बळजबरीनेही असे कृत्य करण्यास भाग पाडले जाते.

लहान मुलांबाबत तर ही शक्यता अधिक असते कारण आपण काय करतो आहोत याची त्यांना कल्पनाच नसते. पण असे व्हीडीओ हातोहात प्रसारित होतात आणि त्यातून निर्मात्यांचा उद्देश सफल होतो. हा सगळा प्रकार लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने या पळवाटा बंद करण्यासाठीची कडक भूमिका घेऊन अशा साहित्याच्या वापरावरच आघात करताना अशा ग्राहकांनाच कायद्याच्या कक्षेत आणले आहे. त्यामुळे आता अशी सामग्री प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात तक्रार करण्याची जबाबदारी आता युजअर्सवर न्यायालयाने कायद्यान्वयेच टाकली आहे. त्यामुळे आता अशी सामग्री प्राप्त झाल्यावर वा पाहिल्यावर त्याबाबत तक्रार न करणाऱ्या व्यक्तीही दोषी मानल्या जाणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुळात लैंगिक शोषण हे वाईटच आणि त्यात न कळत्या वयात असणाऱ्या बालकांचे लैंगिक शोषण महाभयंकरच. कारण अशा शोषणाने त्या बालकाचे संपूर्ण आयुष्य व भावविश्व पूर्णपणे उद्ध्वस्त होते. या मानसिक आघातातून ही अत्याचारग्रस्त बालके सावरूच शकत नाहीत. आभासी जगातल्या विकृत आनंदाची पूर्तता करण्यासाठी आरंभलेल्या चाईल्ड पोर्नोग्राफीसारख्या प्रकारांवर त्यामुळेच कायद्यान्वये नियंत्रण आणले जाणे अत्यंत आवश्यक बनले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ताजा निकाल या दृष्टीने पडलेले मोठे आश्वासक पाऊल आहे. आता या कायद्यातील पळवाटांना चाप लावण्याची म्हणजेच या निकालाच्या अनुषंगाने कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्याची जबाबदारी यंत्रणा व समाजावर आहे. या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने बालकांना संरक्षण उपलब्ध करून दिले आहे. मात्र, ते तसे मिळावे याची जबाबदारी न्यायालयाने पोलिस व इतर यंत्रणांवर सोपवली आहे. ही जबाबदारी यंत्रणा कशी पार पाडतात हे पाहणेही या न्यायालयाच्या निकालाइतकेच महत्त्वाचे ठरणार आहे. हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने संसदेलाही अनेक सूचना केल्या आहेत. बालकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होता कामा नये हे सुचवितानाच लैंगिक आरोग्यासंबंधीचे गैरसमज दूर करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले आहे.

तंत्रक्रांतीने इंटरनेटच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या आभासी संचारात लैंगिक विकृती आता मानवी भावभावनांवर थेट परिणाम करेल एवढ्या त्वरेने पोहोचते आहे. त्यामुळे केवळ कायदा कडक केल्याने त्याचा मुकाबला करता येणार नाहीच तर कडक कायद्याच्या जोडीला शिक्षण, प्रतिबंध आणि कडक शिक्षा या प्रक्रियाही त्याच वेगाने राबविल्या जाणे आवश्यक आहे. अशी सामग्री निर्माण करणे हा जसा गुन्हा तसेच ती सामग्री बघून अशा उद्योगाला समर्थन देणे हा ही गुन्हाच आहे, हे लक्षात घ्यायला हवे. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल हेच समाजाच्या लक्षात आणून देणारा आहे. अधोविश्वातील अशा उद्योगांना मिळणारे समर्थन अनेक प्रकारच्या शोषणास जन्माला घालणारेच असते. आता या निकालाची योग्य व पारदर्शी अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान व्यवस्थेसमोर व समाज म्हणून आपल्यासमोर आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आता या प्रश्नाची वा समस्येची कायमची तड लागली असे समजण्याचे काहीच कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. त्यानुसार या संदर्भात योग्य धोरण तयार करणे व या धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणीचे सूत्र तयार करून त्यासाठी आवश्यक यंत्रणेची उभारणी करणे हे मोठे व आव्हानात्मक काम आता संसदेला पार पाडावे लागणार आहे. यात या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था व संघटनांनीही सक्रिय सहभाग नोंदवायला हवा. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाने पोलिस खात्याची व त्यातल्या त्यात सायबर गुन्हे शाखेची जबाबदारी खूप वाढली आहे. ती ते योग्य पद्धतीने पेलतात की, या निकालाने तपास यंत्रणांच्या हाती नवे कोलित पडल्याचे चित्र पहायला मिळते, हे आता पहावे लागेल.

# भगवान महाविर स्वामी यांच्या जीवनावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**भगवान महाविर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेचे आयोजन तालुक्यासाठी ३० सप्टेंबर रोजी ठेवण्यात आले आहे. ही स्पर्धा अंबाजोगाई तालुक्यातील प्रत्येक शाळांमधून होणार आहे. या निबंध स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**

भगवान महावीर २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन प्रत्येक जिल्हास्तरावर करण्यात आले आहे. अंबाजोगाई तालुक्यात ही स्पर्धा दि.३० सप्टेंबर प्रत्येक शाळेत शालेय वेळेतच होणार आहेत. भगवान महावीर यांचे जीवन सिद्धांत व संदेश यावर आधारीत ही स्पर्धा आहे. भगवान महावीरांचे जीवन कार्य यावर आयोजित या स्पर्धेसाठी शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी लाखो रूपयांचे बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. शासनाने ही स्पर्धा सर्वत्र आयोजित केली आहे. अंबाजोगाई तालुक्यात होणार्या स्पर्धेत सर्वशाळेतील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. असे आवाहन बीड शासकीय जिल्हा समिती सदस्य रक्षा धनराज सोळंकी, हितेश बलदोटा, अशोक लोढा, अशिष जैन, शैलेश कंगळे यांनी केले आहे. तर या निबंध स्पर्धेसाठी लागणार्या उत्तर पत्रिकांची सुविधा सामाजिक कार्यकर्ते धनराज सोळंकी यांनी केली आहे. या उत्तर पत्रिका प्राप्त करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापक यांचे पत्र घेऊन शाळेतील प्रमुखांनी ९१०७८९१००८, ९४२२२४२३२६ ,९३५६६२३५९२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदारकीचं सोनं करणे हेच माझे ध्येय-आ.बाळासाहेब आजबे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आज पर्यंत तालुक्यात विविध विकास कामासाठी निधी आणून ते काम केले आहेत जनतेच्या विकासासाठी मी अहोरात्र प्रयत्न करत असून मी आज पर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याचा रुपया खाल्ला नाही त्यामुळे माझ्याकडे कुणाची बोट करायची ताकद नसल्याचे प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी घाटा पिंपरी येथे व्यक्त केले ते घाटा पिंपरी येथे दहा लक्ष रुपयांच्या सभामंडपाची उद्घाटन प्रसंगी बोलत होते ते पुढे बोलताना म्हणाले की दीडशे गावात दहा लक्ष रुपयांचे सभामंडप टाकले आहेत राहिलेल्या



गावात दहा लक्ष रुपयाच्या सभामंडप टाकण्यात येतील गावात त्यात कार्य झाले पाहिजे म्हणून मी हा निर्णय घेतला आहे ज्या लोकांची अडचणी आहेत त्या सोडवण्याचा प्रयत्न मी सतत करत आहे गावाची गरज काय आहे ते मी पाहतो देवळाली ते सीना नदीपर्यंत पाणी साचले पाहिजे त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे त्यासाठी नदी खोलीकरण व संरक्षण भिंत गरजेचे आहे दादेगाव सब स्टेशन मंजूर असून नऊ सबस्टेशन मंजूर केले आहेत त्यात एकूण ५६८ डीपी मंजूर केले मी जे मंजूर झाले मी खोटे आश्वासन देत नाही याच्या आधी बंधारे का झाले नाहीत असा अहवाल हे त्यांनी विरोधकाचे नाव न घेता उपस्थित केला राहिलेल्या दोन वर्षात दोन हजार कोटीचा निधी आणणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हरिभक्त परायण बबन महाराज घुमरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नाकाडे देवळालीचे सरपंच शेकडे पोपट , सरपंच विठ्ठल नागरगोजे ,प्पु गवळी बबनराव राझणे दिलीप तांदळे फसले मेजर हरिभाऊ दहातोंडे परशुराम मराठे सह गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपरिषद, संघटनेच्या प्रदेशअध्यक्षपदी पवार तर कार्यकारी अध्यक्षपदी देशमुख यांची बिनविरोध निवड

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत, संवर्ग कर्मचारी संघटनेचा महामेळावा व सर्वसाधारण सभा तासगाव नगरपरिषदेचे स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार भाई गणपतराव कोळी मल्टीपर्पज हॉल, बासुंबे फाटा मणेराजुरी रोड तासगाव जि.सांगली येथे संघटनेचे वरिष्ठ नेते संघटना प्रमुख थी. रामेश्वर बाघमारे नांदेड पांचे अध्यक्षतेखाली व संघटनेचे जेष्ठ नेते श्री. सुभाष मोरे कोल्हापूर, बी. केशव कानपुडे उपायुक्त जालना नगरपरिषद यांच्या प्रमुख उपस्थित पारपडला सदर मेळाव्यात संघटनेच्या पदाधिका-यांनी उपस्थित कर्मचा-यांच्या अडी-अडचनी समजावून घेतल्या त्यामध्ये नवनिर्मीत नगरपरिषद, नगरपंचायत मध्ये समावेशना पासून बंचित राहीलेल्या उदघोषणा पूर्वीचे



व नंतरचे म्हणजे सध्या जे कार्यरत कर्मचारी आहेत त्यासर्व करमचा-यांचे विना अट सरसकट समावेशन करणे व जे समावेशना बाधी सेवानिवृत्त झाले त्यांना लाभ मिळवूण देणे तमेच २००५ नंतरच्या सर्व कर्मचा-यांचा सेवार्थ आय. ही तात्काळ कारणे न.प आस्थापनेवरील सर्व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय प्रतिपूर्ती चालू करणे न.प मेवानिवृत्त कर्मचा-यांची सेवा पुस्तके विभागीय कार्यालया ऐवजी जिल्हा स्तरावर तपासणी करुन मिळावी तसेच वर्ग ४ कर्मचा-यांच्या नियुक्त्या जिल्हा निवड समिती मार्फत व्हावेत या प्रमुख मागण्यांसह इतर ही मागण्यांवर चर्चा करण्यात आली या सर्व मागण्या रास्त असून त्या मान्य झाल्या शिवाय संघटना स्वस्त वसनार नाही असे थी, अनिल पवार थी. रामेशचर वाघमारे थी. अभिजीत गोरे बांनी सांगितले यावेळी संघटनेचे प्रदेशअध्यक्ष म्हणून बिटा नगरपरिषद जि.सांगली येथील थी. अनिल पवार, कार्याअध्यक्षपदी नांदेडचे श्री. सतिश देशमुख तर धाराभिय नगरपरिषदेचे थी. अभिजीत गोरे सरचिटणीसपदी, उपाध्यक्षपदी महावळेश्वर जि. साताराचे सचिन कदम, यवतमाळचे थी. बालाजी माळचापुरे तर संचालकपदी नांदेड येथील वैजनाथ स्वामी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उर्वरीत कार्यकारणीमध्ये मान्नागार म्हणून थी. सुभाष निरावार सदस्यपदी थी. बालाजी हरडपकर, थी. कृष्णा योकेफोडे, श्री. गणेशजी मदने श्री. मुधळे तर सहसचिवपदी श्री. जावेद इनामदार, थी. आयुब मणेर यांची ही बिनविरोध निवड करण्यात आली. तमेच संघटनेच्याप्रमुखपदी श्री. रामेश्वर बाघमारे यांनी काम पहावे असे सर्वानुमते ठरले व त्यांची ही निवड संघटनाप्रमुखपदी करण्यात भाली. या मेळाव्याचे आयोजन पुणे विभागाच्यावतीने करण्यात आले होते हजारोच्या संख्येने नांदेड जिल्हा, यवतमाळ जिल्हा, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपरिषद, नगरपंचायत, संवर्ग कर्मचारी उपस्थित होते. नायोजक थी. आयुध मणेर श्री. राजु काळे तामयाय, थी. सदानंद बोडके कडेगांव, थी. देवा देवकुळे पाटण, थी. जालिंदर माने कवठेमहांकाळ, श्री. सचिन तुपे चंद्र जिरगाले पलुस, श्री. प्रकाश शिंदे शिराळा, थी. सारंग यादव आटपाडी, श्री. यशवंत माळी जत, श्री. आधिक इंगळे इस्लामपूर, श्री. अजित जाधव बानापूर, श्री. संदीप कदम आष्टा, श्री. मल्हारी खिलारे विटा, यांनी नेटके नियोजन केले होते.




# अंबडमध्ये स्वच्छ भारत अभियान

**अंबड। प्रतिनिधी**

अंबड नगर परिषद कडून स्वच्छ भारत अभियान स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा अभियान या अंतर्गत आज दि २६/०९/२०२४ रोजी केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता पंधरवडा मार्फत स्वच्छ्ता ही सेवा अभियान स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता राबविण्याचे कळविलेले आहे. त्याअंतर्गत दि. ३०/०९/२०२४ रोजी मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांच्या मार्गदर्शनखाली शहरातील पुष्करणी बारव येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मध्ये नगर परिषद अंबड चे अधिकारी व कर्मचारी यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना स्वच्छता अभियान मध्ये सहभाग नोंदीला.

## पान १वरून...

### कापूस-सोयाबीन अनुदानापोटी

शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लक्ष रुपये रक्कम वर्ग करण्यात आली. २०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी २६४६ कोटी ३४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुदान स्वतंत्ररीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटी द्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. त्यावर शेतकऱ्यांची स्वतःचे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करून ती माहिती जुळणे आवश्यक असल्याने यामध्ये काही कालावधी लागला. आज जवळपास ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना आपण याद्वारे लाभ दिला आहे. आधार व अन्य माहितीची जसजशी जुळणी होत राहील तसं तसे उर्वरित शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ दिला जाईल अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

---------------

### उपमुख्यमंत्री अजित दादा

बहीण योजना परली विधानसभा अशासकीय समितीचे अध्यक्ष वाल्मिक अण्णा कराड, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, त्याचबरोबर युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, युवती आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सोनवणे, विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांसह आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. लाडक्या बहिणींचा हा मेळावा परळी वैद्यनाथ शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानात दुपारी ३ वाजता संपन्न होणार असून, तत्पूर्वी दुपारी दीड वाजल्यापासून छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) येथून दादांची भव्य स्वागत मिरवून निघणार आहे. ही मिरवणूक तीन वाजता मुख्य कार्यक्रम स्थळी पोचून ३ वाजता मेळाव्यास सुरुवात होईल. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या लाडक्या बहिणींना लाभ आणि बळ देण्याच्या या भव्य जनसन्मान यात्रेत परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील महिला भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

**परळीच्या अक्षराताईचा दादांच्या हस्ते होणार सन्मान**

दरम्यान मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांच्या रकमेतून स्वतःचा व्यवसाय सुरू करून एक आठवड्यात १२,००० रुपयांचा नफा मिळवणाऱ्या सौ.अक्षराताई अक्षय शिंदे या ताईंचा अजितदादा व मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर योजनेतील पात्र ठरलेल्या महिलांना प्राथमिक स्वरूपात प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

--------------

### परळी मतदारसंघास

उत्पादन घेतले जाते. अंबाजोगाई, परळी, केज, धारूर, शिरूर- कासार, गेवराई, आष्टी, पाटोदा, माजलगाव, वडवणी परिसरातील वातावरण सीताफळ उत्पादनासाठी पोषक आहे. गेल्या ५ वर्षात बीड जिल्ह्यामध्ये सरासरी २६ हजार हे. क्षेत्रात २.२० लाख मेट्रिक टन सीताफळाचे उत्पादन झालेले आहे. गेल्या २ वर्षांपासून सीताफळस सरासरी ६० रुपये प्रति किलो याप्रमाणे शेतकऱ्यांना भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांची सीताफळ लागवडीकडे कल वाढला आहे. या परिसरात उत्पादित होणाऱ्या सीताफळावर याच ठिकाणी संशोधन व प्रक्रिया झाल्यास सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार असल्याने या ठिकाणी सिताफळ ईस्टेट प्रस्तावित करण्यात आली होती. या सिताफळ इस्टेट मध्ये प्रशासकीय इमारत, शेतकरी भवन, शेडनेट, पॉलिहाऊस, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, प्रशिक्षण केंद्र, सिताफळ प्रक्रिया युनिट, निर्यात युनिट, कोल्ड स्टोरेज, साठवणूक गोदाम उभारण्यात येणार आहे. १६ अधिकारी कर्मचारी, तज्ञ व शास्त्रज्ञ यांची नियुक्ती करण्यात येणार आहे या इस्टेट मुळे सिताफळ पिकाची उत्पादकता वाढवण्यास मदत होईल. तसेच साठवणूक व प्रक्रिया सुविधांचा विस्तार केला जाईल. तसेच निर्यातक्षम व गुणवत्तापूर्ण कलमे विकसित करण्यासाठी करण्यात येईल. त्यामुळे सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांची उत्पादकता वाढेल. तसेच त्यांचे आर्थिक उत्पन्न सुद्धा वाढेल असा विश्वास कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला आहे. तसेच या प्रस्तावास मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार व यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त केले आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात अलिकडील काळात शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र अशा शासकीय संस्था याआधी मंजूर केल्या असून त्यासाठीही निधी उपलब्ध करून दिला आहे. आजच कृषी विभागाच्या सोयाबीन, कापूस विशेष अनुदान योजनेतील पहिल्या टप्प्याचे वितरण सुरू करण्यात आले असून, याचा लाभ बीड जिल्ह्यातील ४ लाख २२ हजार शेतकऱ्यांना झाला असून, याद्वारे १६० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

---------

### ३० लाख मराठ्यांना कुणबी

महत्त्वाची बैठक पार पडली. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे ही बैठक पार पडली. या बैठकीत राज्य मंत्रिमंडळाचे प्रमुख नेते, उपसमितीमधील मंत्री आणि मराठा समाजाचे विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. जवळपास दोन तास ही बैठक चालली. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या बैठकीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. पाटील पुढे म्हणाले, मराठा समाजाला एसीबीसी वर्गातून आरक्षण दिल्यानंतरही वेगळे १० टक्के आरक्षण दिल्यानंतर ते आम्ही कोर्टात टिकवू. याआधीचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाचं दिलेलं मराठा आरक्षण हे सुप्रीम कोर्टात टिकलं नाही. त्यावेळच्या ठाकरे सरकारने पुरेशी मेहनत घेतली नाही, असा आमचा आरोप आहे. पण ते आरक्षण फेटाळताना सुप्रीम कोर्टाने जी निरीक्षण नोंदवली, त्यांचा विचार करुन, उदाहरणार्थ सॅम्पल जास्त घ्यायला हवे होते. पण ते ३ कोटी घेतले. त्यामुळे आमचा दावा असा आहे की, मराठा समाजाला दिलेले एसीबीसी आरक्षण आम्ही टिकवू. तरीसुद्धा मराठा समाजाची मोठ्या प्रमाणात मागणी आहे की, आम्हाला सरसकट कुणबी जात प्रमाणपत्र द्या, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

अशी बैठक झाल्यानंतर मग एक बैठक झाली. निवृत्त न्यायाधीशांची जी समिती झालेली आहे, निवृत्त न्यायाधीश भोसले, गायकवाड आणि शिंदे यांच्यासोबत एजी आणि लॉ सेक्रेटरी, आम्ही शंभूराज देसाई, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, रणजितसिंह राणा असे सर्वजण बसलो. या बैठकीत जो निष्कर्ष निघाला की, १० प्रकारचे डॉक्यूमेंट्स ही कुणबी दाखला मिळणार यासाठी हवी होती ती आपण ४२ केली. कुणबी दाखवा मिळवण्याचे काम सोपे केले. त्यातही न्यायमूर्ती शिंदे समिती नेमल्यानंतर १ लाख ७६ हजार नोंदी सापडल्या. एक नोंदी ही ३०० दाखले निर्माण करतात. मुलगा, चुलत भाऊ, बहीण यांनाही नोंदी जातात. त्यामुळे लाखो मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे मिळाली. पण सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास खूप कायदेशीर अडचण आहे, असे लक्षात आले, अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली. पण असे धरले की, दोन दिवसांनी मराठा संघटनांच्या नेत्यांकडून आलेल्या मागण्या, जशी की, एसीबीसी आम्हाला नको, आम्हाला पुन्हा आर्थिक दृष्टा ईडब्ल्यूएसचे आरक्षण द्या. कारण ते आरक्षण सुप्रीम कोर्टातल टिकले. त्यामुळे ते आरक्षण मागे जाण्यास वाव नाही. त्यात जातीचे आरक्षण नसणाऱ्यांना ते मिळत असल्यामुळे खूप कमी असल्याने मराठा समाजाला गेल्या तीन वर्षात हे आरक्षण साडे आठ ते नऊ टक्के मिळाले. केंद्रातही सवलती त्यांना पात्र असतात. आम्ही ते घालवलं आणि एसीबीसी मिळवले. आमचे एसीबीसी काढून घ्या. पण एसीबीसी असताना आर्थिक दृष्या मागासचे आरक्षण देता येत नाही. त्याची तळटीपच अशी आहे की, जातीचं आरक्षण मिळणाऱ्यांना ते आरक्षण मिळणार नाही. आता हा नवीनच विषय समोर आला आहे. एसीबीचे दिलेले आरक्षण मागे घेणे हे सोपे नाही, अशी भूमिका चंद्रकांत पाटील यांनी मांडली.

-----------------

### अहवाल सकारात्मक नसला

हा अहवाल असण्याची शक्यता आहे. ८३ व्या क्रमांकावर मराठा आणि कुणबी एकच आहे. यावर शिंदे समितीने काम केलेले असेल तरच त्या समितीचा उपयोग आहे, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले आहे. शिंदे समिती काम कशावर करते, हैदराबाद, बॉम्बे आणि सातारा गॅजेट घेऊ हे शिंदे समितीकडे निवासी सांगण्यात आले होते. गॅझेटमध्ये असणाऱ्या नोंदी, नंतर सापडलेले आठ हजार पुरावे, संस्थानाकडे सापडलेले पुरावे, ८० क्रमांक हा वेगळा भाग आहे. सग्या सोयऱ्याची अंमलबजावणी, रोटीबेटी व्यवहार हे सर्व सांगण्यासाठी शिंदे समिती गठीत करण्यात आली होती. मराठा आणि कुणबी एकच आहे आणि यासाठीच शिंदे समिती गठीत करण्यात आली होती. राज्यातील मराठा आणि कुणबी एकच आहे आणि तोच अहवाल राज्य सरकारने स्वीकारला आहे ही चांगली गोष्ट आहे. अहवाल स्वीकारला ही चांगली गोष्ट आहे, गरिबांना न्याय मिळावा. तीनही गॅझेट घेऊ म्हणाले आहेत, असे मत मनोज जरांगे यांनी मांडले आहे.

-----------------

### अतिवृष्टीची अवघ्या

कृषीमंत्र्यांच्याच जिल्ह्यात असे होत असेल तर इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे काय? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

------------

### राज्यात झिका वाढतोय

महिलांना अधिक असल्याने गर्भवती महिलांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. दादरमध्ये ८६ वर्षीय पुरूषाला गेल्या आठवड्यात झिकाची लागण झाली असून हिंदुजा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. रूग्ण वयोवृध्द असल्याने इतरही आजार असल्याचे सांगण्यात आले. पण आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुणे मनपा विभागात १००, पिंपरी चिंचवड ०६, अहमदनगर (संगमनेर) ११, पुणे ग्रामीण ९, कोल्हापूर १, सांगली (मिरज) १, कोल्हापूर १, सोलापूर १ एकूण १३० रुग्णांची नोंद झाली आहे. झिका रूग्ण सापडल्यानंतर अशा ठिकाणी त्वरीत ट्रॅकिंग आणि ट्रेसिंग कामाची सुरुवात करण्यात येते.

--------------

### अजितदादांच्या जनसन्मान यात्रेस

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे,ना. सुनील तटकरे,पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, माजी आ.अमरसिंह पंडित,आ. आजबेकाका,मा.नगराध्यक्ष योगेश क्षीरसागर,पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश चव्हाण,यांच्यासह पक्षाच्या अनेक प्रमुख नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.त्यामुळे माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी या जनसमान यात्रेनिमित्त होणाऱ्या जाहीर सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थिती लावावी.असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांच्यासह बीड जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

------------

### लोकसभा निवडणुकीतील विरोधाचा वचपा

जिल्हाध्यक्ष मोहन आघाव यांनी दिला आहे. बीड जिल्ह्यात विकासाची गंगा आणणारे नेतृत्व म्हणून आ.पंकजाताई मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्याचा अभूतपूर्व असा विकास झालेला आहे, हे विरोधक देखील नाकारत नाहीत. परंतु लोकसभा निवडणुकीत अशा नेत्यांविरोधात नाहक जातीवादी पेरून त्यांना संपवण्याचा प्रयत्न केला गेला. लोकसभा निवडणुकीत अनेकांनी गद्दारी केल्याचे निकालानंतर उघडकीस आले आहे. तसेच, अनेक नेत्यांनी समाजाचा दबाव असल्याचे सांगत बोटचेपी भूमिका घेतली. त्यांच्या अंग चोरून काम करण्याच्या वृत्तीमुळे अल्पशा मताने बीडसह अनेक ठिकाणी ओबीसी नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. अशा पद्धतीने ओबीसीसोबत राहून ओबीसींविरोधातच भूमिका घेणार्या नेत्यांना आता आमदारकीचे स्वप्न पडू लागले आहेत. अशा भावी आमदारांना ओबीसी समाजबांधवांनी निवडणुकीदरम्यान गावात आल्यास जाब विचारावा. तसेच, यापूर्वी बीडच्या आमदारांना मतदारसंघातील अनेक गावातून ओबीसी समाजबांधवांनी हाकलून दिले आहे. काही बड्या नेत्यांवर तर चक्क पोलीस बंदोबस्त घेऊन मतदारसंघात दौरा करण्याची नामुष्की ओढावली आहे. लोकसभा निवडणुकीत बिळात जाऊन बसलेले काही नेते त्यावेळी समाजाचा दबाव असल्याचे सांगत होते. आता अशा नेत्यांवर विधानसभा निवडणुकीवेळी समाजाचा दबाव नाही का? असा सवाल देखील मोहन आघाव यांनी उपस्थित केला आहे.

------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.०१ ऑक्टोबर २०२४



# अंबडमध्ये स्वच्छ भारत अभियान

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषद कडून स्वच्छ भारत अभियान स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा अभियान या अंतर्गत आज दि २६/०९/२०२४ रोजी केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय () भारत सरकार यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता पंधरवडा मार्फत स्वच्छ्ता ही सेवा अभियान स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता




राबविण्याचे कळविलेले आहे. त्याअंतर्गत दि. ३०/०९/२०२४ रोजी मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांच्या मार्गदर्शनखाली शहरातील पुष्करणी बारव येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मध्ये नगर परिषद अंबड चे अधिकारी व कर्मचारी यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना स्वच्छता अभियान मध्ये सहभाग नोंदीला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेतील लाभामध्ये दुप्पट वाढ; उत्पन्नाची अट रद्द

## मंत्रिमंडळाची मान्यता; कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या वतीने अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत घटकांचे सुधारित निकष निश्चित करून आर्थिक लाभ वाढवण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०१७ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हा परिषदेचे निधी वितरित करण्यात येतो. रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन विहिरीसाठी चार लाख रुपये अनुदान दिले जाते मात्र त्या तुलनेत या योजनेतील लाभ घेण्यास लाभार्थी इच्छुक नसल्याचे दिसून आल्याने कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी योजनेतील लाभ वाढविण्याचे प्रस्तावित केले होते.



या योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी दीड लाख वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे विहिरीच्या खोलीची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे या योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अनेक तांत्रिक अटींमध्ये भरपूर सवलती देण्यात आलेल्या आहेत.

मंत्रिमंडळाच्या मान्यतेमुळे आता अनुसूचित जाती नव बौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहिरीसाठी २.५ लाख ऐवजी ४ लाख रुपये मिळतील. जुनी विहीर दुरुस्त करण्यासाठी ५० हजार ऐवजी १ लाख रुपये मिळतील. शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यासाठी १ लाख ऐवजी २ लाख मिळतील.

तसेच इनवेल बोरिंग साठी २० ऐवजी ४० हजार, वीज जोडणी आकार १० ऐवजी २० हजार, विद्युत पंप संच साठी २० ऐवजी ४० हजार, सोलार पंपसाठी ३० हजार ऐवजी ५० हजार, एचपीडीई पीव्हीसी पाईप साठी ५० हजार, तुषार सिंचन संच साठी २५ ऐवजी ४७ हजार, ठिबक सिंचन संच साठी ५० हजार ऐवजी ९७ हजार, तसेच तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन पूरक अनुदान यातसुद्धा जमीन धारणेच्या प्रमाणात घसघशीत वाढ करण्यात आली आहे.

या प्रस्तावास मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# शिवसंग्रामच्या वतीने आयोजित ''होम मिनिस्टर'' कार्यक्रमाची जय्यत तयारी

## महिलांनी नाव नोंदणी करावी - मनीषा कोकाटे

### सिनेअभिनेता क्रांती नाना मळेगावकर आणि टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांची असणार उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्रामच्या वतीने नवरात्र उत्सवात ''जागर मातृ शक्तीचा'' हे अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा ''होम मिनिस्टर'' (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रम दि. ०७ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वा. आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आयोजत केला आहे. या कार्यक्रमासाठी महिलांनी ८९७२१४७२७२ या क्रमांकावर नाव नोदणी करावी असे आवाहन पंचायत समितीच्या मा.सभापती मनीषा कोकाटे यांनी केले आहे.

शिवसंग्रामच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ''होम मिनिस्टर'' (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे. महिलांच्या जिवाला थोडा विरंगुळा पाहिजेच यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे.



या कार्यक्रमात पारंपरिक खेळांबरोबर यंदा महिलांना ''होम मिनिस्टर'' सारखे आधुनिक खेळही खेळायला मिळणार आहेत. जोडीला आणखीही बरेच स्पर्धात्मक उपक्रम आहेत. यात भाग घेणाऱ्या महिलांसाठी मोठ-मोठी बक्षिसं मिळणार आहेत. सिनेअभिनेता क्रांती नाना मळेगावकर आणि टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांची असणार उपस्थिती या कार्यक्रमासाठी असणार आहे .कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी महिला भगिनींनी आपले नाव, पत्ता, वय लिहून ८९७२१४७२७२ या क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज पाठवून नाव नोंदणी करायची आहे असे पंचायत समितीच्या मा.सभापती मनीषा कोकाटे यांनी म्हटले आहे.

# महापुरुषांच्या शेजारी तो फोटो लावणाऱ्यांवर ॲट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करा : ज्ञानोबा कांबळे यांनी केली मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ख्याती देशासह संपूर्ण जगभर आहे. अनेक देशांत छत्रपती शिवाजी महाराज आणि बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा केली जाते. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री देखील त्यांच्या कार्याला सलाम करीत नतमस्तक होतात. परंतू, अंबाजोगाई तालुक्यातील एका ग्रामपंचायतीमध्ये लाजीरवाणा प्रकार उघडकीस आला होता. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मधोमध चक्क एका माजी मंत्र्यांचा फोटो लावण्यात आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आरक्षणावर निवडून यायचं आणि त्यांच्याच बाजूला फोटो लावायचा ही निषेधार्ह घटना जोगाईवाडी / चतुरवाडी ग्रामपंचायतीमध्ये घडली होती. या घटनेमुळे केज मतदारसंघातील जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. या घटनेला आता एक वेगळेच वळण मिळाले असून संबंधितांवर ॲट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानोबा कांबळे यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी येथील शहर पोलिस ठाण्यात रितसर फिर्यादही दिली आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



या संदर्भात पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत ज्ञानोबा कांबळे यांनी असे म्हटले आहे की, जोगाईवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे सरपंच मनिषा बालासाहेब दोडतले आहेत तर उपसरपंच सुनिल बाबूराव मस्के आहेत. त्या दोघांच्या पक्षांचे नेते अक्षय नंदकिशोर मुंदडा आणि नंदकिशोर शिवभगत मुंदडा हे दोघे आहेत. वरिल चौघांनी संगनमत करून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांचा अनादर करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय जोगाईवाडी येथील शासकीय कार्यालयात विमल मुंदडा यांचा फोटो वरिल तिन्ही महापुरुषांच्या बरोबरीने लावलेला आहे. त्यासोबतच नंदकिशोर मुंदडा यांचा फोटो भिंतीवर लावलेला आहे. बीड जिल्ह्यात सोशल मीडियावर ही बाब प्रसिद्ध झाली आहे. वरील प्रकाराबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्या घटनेचा निषेध करुन कायदेशीर कार्यवाही करण्याची लेखी मागणी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. परंतू, अद्याप कायदेशीर कार्यवाही झाली नाही.

वरिल चारही आरोपी गैर अनुसूचित जातीचे आहेत. मी अनुसूचित जाती पैकी चांभार जातीचा सदस्य आहे. माझ्या सहित सर्व अनुसूचित जाती आणि जमातीचा समूह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत आदर करतो. वरिल महापुरुषांच्या शेजारी विमल मुंदडा यांचा फोटो लावून मनिषा बालासाहेब दोडतले, सुनिल बाबूराव मस्के, अक्षय नंदकिशोर मुंदडा, नंदकिशोर शिवभगत मुंदडा यांनी अनादर केला आहे. तरी त्यांच्या विरुद्ध माझी लेखी कायदेशीर फिर्याद आहे. तरी त्यांच्या विरुद्ध ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करुन त्वरित कार्यवाही करण्यात यावी हि नम्र विनंती, असे फिर्यादीत म्हटले आहे. यावर ज्ञानोबा लक्ष्मणराव कांबळे यांची स्वाक्षरी आहे. या निवेदनाची प्रत पोलिस अधीक्षक, बीड आणि नागरीक हक्क संरक्षण दल, बीड यांना देण्यात आली आहे.

# राजेंद्र देशमुख यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील समता कॉलनी भागातील रहिवाशी राजेंद्र वसंत देशमुख वय ५७ वर्षे यांचे अल्पशा आजाराने दि. २९ सप्टेंबर रविवार रोजी निधन झाले.



त्यांच्या पार्थीवावर मंगलनाथ स्मशानभुमीत दि ३० सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ८:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा,जावाई असा परिवार आहे. राजेंद्र देशमुख याच्यां निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# विनापरवाना बेकायदेशीररित्या पिस्टल बाळगल्या प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर- ॲड.मोहसीन तांबोळी

**बीड । प्रतिनिधी**

दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी शिरुर (का.)तालुक्यातील रायमोहा परिसरात विनापरवाना बेकायदेशीररित्या पिस्टल बाळगल्या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी सोमनाथ गायकवाड यांनी रंगेहाथ पकडून अटक केली होती त्यानंतर दि.२२ सप्टेंबर रोजी शिरुर का.येथील फौजदारी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी दिली गेली त्यानंतर आरोपीला दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयात हजर केले असता आरोपीचे वकील ॲड.मोहसीन अय्युब तांबोळी यांनी आरोपीला तुरुंगात ठेवण्यासाठी फिर्यादीने कोणतेही ठोस कारण दाखवले नाही त्यामुळे आरोपीला कैदेत ठेवून कोणताही हेतू साध्य होणार नाही असा युक्तीवाद केला व मा.न्यायदंडाधिकारी शिरुर का.यांनी आरोपीस जामीन मंजूर केला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आसिफ उर्फ बाबर रशिद पठाण, रा.रायमोहा ता.शिरुर (का.) जि.बीड हा इसम जिल्हा परिषद शाळेसमोर रस्त्यावर रायमोहा ता.शिरुर (का.) येथे उभा आहे व त्याच्याकडे पिस्टल आहे अशी माहिती पोहेकॉ.सोमनाथ शरद गायकवाड यांना व त्यांचे सहकारी कांबळे, दुबाले, यादव आणि कोरडे यांना मिळाली या माहितीवरुन त्यांनी आसिफ उर्फ बाबर रशिद पठाण यास पिस्टलसह तसेच एक जिवंत काडतूससह रंगेहाथ पकडून त्या विरोधात शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३ तसेच शस्त्र अधिनियम १९५९ कलम २५ अन्वये २३८/२४ पोलीस स्टेशन पाटोदा येथे गुन्हा नोंद झाला होता. याप्रकरणी आरोपीस दि.२२ सप्टेंबर रोजी न्यायालयात हजर केले असता त्यास दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली होती त्यानंतर दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी आरोपीच्या वतीने ॲड.मोहसीन अय्युब तांबोळी, रा.रायमोह ता.शिरुर (का.) जि.बीड यांनी मा.फौजदारी न्यायालय शिरुर (का.) येथे युक्तीवाद केला व आरोपीस जामीन मिळाली यावेळी आरोपीच्या वतीने ॲड.मोहसीन तांबोळी यांनी काम पाहिले व त्यांना ॲड.प्रविण राख यांचे मार्गदर्शन लाभले तसेच ॲड.रफिक पठाण यांनी सहकार्य केले.

# नवरात्र उत्सवा निमित्त रेणुकादेवी व मुळजोगाई देवस्थान अंबाजोगाई येथे ०३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी नवरात्र उत्सवा निमित्य श्री रेणुकादेवी व श्री मुळजोगाई देवस्थान, अंबाजोगाई येथे ०३ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर दरम्यान अखंड हरिनाम सोहळ्या निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी श्री. दत्तात्रय अंबेकर व उत्सवाचे चालक नानाश्री यादव यांनी दिली आहे.**

कै. मुकुंदअप्पा यादव कै. शामलाल मोदी, कै. शिवाजीराव अंबेकर, कै. बी. एन. सातपुते, कै. ताराचंद परदेशी यांच्या प्रेरणेने व वै. माधवबुवा शास्त्री, किसन महाराज पवार यांच्या आशिर्वादाने आश्विन शु.१ गुरुवार दि. ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी या सोहळ्यास प्रारंभ होणार असुन सकाळी ७ वा श्री योगेश परदेशी यांच्या हस्ते घटस्थापना होईल व श्री विष्णुशेठ बजाज यांच्या हस्ते गाथा पुजनाने या महोत्सवास प्रारंभ होईल. वार्षिक महोत्सवाचे हे ३५ वे वर्ष आसुन या महोत्सव काळात सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम ७ ते ८, श्री बाळू औसेकर यांचा सप्तशितीपाठ, ८ ते ९ अभिषेक, ९ ते १२ गाथ्यावरील भजन, ११ ते १ हरिकिर्तन, सायं. ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ आरती या प्रमाणे दैनंदिन कार्यक्रम होणार असून या उत्सवात श्री.ह.भ.प. बाळासाहेब महाराज कुलकर्णी, श्री.ह.भ.प. विकास महाराज गडदे, श्री.ह.भ.प. गुरुवर्य अच्युत महाराज जोशी, ह भ प अमोल महाराज गोरे सोनपेठकर, ह.भ.प. डॉ. पांडुरंग महाराज तिडके, श्री.ह.भ.प. डॉ. नाथराव महाराज गरजाळे, श्री.ह.भ.प. शिवाजी महाराज ठोंबरे, श्री.ह.भ.प. गोविंद महाराज सुकरे की ना वारकरी संस्था, अंबाजोगाई), ह भ प पांडुरंग महाराज कोकाट नांदगाव, ह भ प प्रमोद महाराज आव्हाड, श्री.ह.भ.प.गजानन महाराज सुवर्णकार घाटनांदूर, श्री. ह. भ. प. श्रीकृष्ण महाराज चवार, श्री. ह. भ. प. प्रभाकर महाराज उगले यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आलेले आसुन या सप्ताहात दररोज श्री संत सावता महाराज भजनी मंडळ आनंद नगर, दत्त मंदिर भजनी मंडळ, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, खडकपुरा भजनी मंडळ, योगायोग भजनी मंडळ, मध्यवर्ती हनुमान भजनी मंडळ, दक्षिणमुखी भजनी मंडळ हजेरी लावणार आहे. दि. ११ ऑक्टोबर २०२४ शुक्रवार रोजी सकाळी १० वा. अशोक मोदी यांच्या हस्ते होम-हवन होवून दुपारी १ वाजता पुर्णाहुती पडेल व दुपारी ४ वा मा. तहसिलदार श्री विलास तरंगे साहेब यांच्या हस्ते श्री रेणुका देवी पालखीची आरती व मा. नगराध्यक्ष, अंबाजोगाई यांच्या हस्ते श्री मूळजोगाई देवीची आरती होऊन श्री रेणुका देवीच्या पालखी सोहळ्यास प्रारंभ होईल व गावाची परिक्रमा झाल्या नंतर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे यांच्या हस्ते मंदिर स्थळी आरती होऊन पालखी सोहळ्याची सांगता होईल. आश्विन शु. १५ बुधवार १६ ऑक्टोबर रोजी श्री अरुण रामकृष्ण काळे यांच्या हस्ते पुजन व श्री.ह.भ.प. गुरुवर्य किसन महाराज पवार यांचे काल्याचे किर्तन होईल. १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत स्थानिक आराधी मेळा होऊन या सोहळ्याची सांगता होईल. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी अशोक मोदी, मनोज मोदी, सितेंद्र सातपुते, रामेश्वर रांदड, मनोज जाधव, योगेश परदेशी, प्रमोद पाटील, सौ शामल अंबेकर, श्री. आमोल घोडके, श्री. राज कुडके, गणेश अंबेकर, प्रतिक्षा अंबेकर, प्रांजली अंबेकर, परमेश्वर दोनगहु, राहुल मोदी यांच्या सह असंख्य कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.



पान ६ वरून...

## जो पक्ष आपल्याला प्रतिनिधित्व

संख्येच्या प्रमाणात माळी समाजाला प्रत्येक ठिकाणी सत्तेत वाटा मिळावा आणि मतदाराच्या भूमिकेतून माळी समाजातील तरुण कार्यकर्त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेत यावे अशी मानसिकता तयार करण्यासाठी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड.सतिष शिंदे व त्यांचे सर्व सहकारी यांनी दि. २० सप्टेंबर पासून पुणे येथून माळी समाजाचा सत्तेत वाट असावा यासाठी संवाद दौरा सुरू केला.क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांनी ज्या पुणे येथील फुले वाड्यातून क्रांतीला सुरुवात केली. त्या ठिकाणी जाऊन या महान विभूतिला अभिवादन करून या संवाद दौऱ्याला सुरुवात झाली. या संवाद यात्रेत मोठ्या संख्येने महात्मा फुले युवा दलाचे महाराष्ट्रातील कार्यकर्ते तसेच माळी समाजाचे कार्यकर्ते सहभागी झाले. प्रत्येक गावात जाऊन आपली भूमिका समजावून सांगत आगामी निवडणुकीमध्ये काय भूमिका घ्यायची यासाठी ॲड.सतिष शिंदे यांनी संवाद दौरा सुरू केला आहे. माळी समाज आतापर्यंत मतदारांच्या भूमिकेत होता.

सत्तेत आपल्याला वाटा मिळावा अशी अपेक्षा त्यांनी कधी केली नाही. सद्य परिस्थितीत मतदाराच्या भूमिकेतून उमेदवाराच्या भूमिकेत जाणे गरजेचे आहे. संख्येच्या प्रमाणात समाजाला सत्तेत वाटा मिळावा अशी ॲड. सतिष शिंदे यांची भूमिका आहे.या संवाद दौऱ्यात समाजातील तरूण उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आहेत. सोमवारी सतीश शिंदे यांनी बीड तालुक्यातील नवगण राजुरी म्हाळस जवळा ,नागापूर खुर्द ,नाळवंडी, शिरूर तालुक्यातील हिवरशिंगा, वडवणी, धारूर तालुक्यातील तेलगाव, माजलगाव तालुक्यातील पात्रूड, माजलगाव, खरात आडगाव किटी आडगाव. माली पारगाव आदी ठिकाणी दौरा केला .यावेळी या दौऱ्याला उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. या दौऱ्यात महात्मा फुले युवा दलाचे जिल्हाध्यक्ष, सर्व तालुका अध्यक्ष ,पदाधिकारी उपस्थित होते.

## सिताराम क्षीरसागर यांची

सोळंके यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन ही निवड केली असून. पक्ष बळकटीसाठी व पक्ष संघटनेच्या कार्यासाठी तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री, मा.ना.श्री. अजितदादा पवार साहेब यांचे ध्येय धोरण विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी व मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी आपन सहकार्य करावे असे सूचित करण्यात आले आहे निवडीबद्दल अभिनंदन..नासेर खान पठाण ,खलिल पटेलतोफीक लालाराजेश क्षीरसागर, वैभव क्षिरसागर,विलास साळवे,शंकर आबुज यांनी केले आहे.

## होम मिनिस्टर कार्यक्रमास

पांगारकर- साळुंके,सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर, डॉ सौ.अंजलीताई पांगारकर,सौ.शारदा डुलघज सौ. संजीवनी ताई पौळ सौ. सिंधुताई पौळ,सौ.गीता ताई जयंत वाघ,सौ.डोंगर ताई आदी मान्यवर महिलांची उपस्थितीत पारपडले.होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे १८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या कार्यक्रमाने दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे.लोकप्रिय होत आहे.याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित आणि माजीमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर महिला आघाडी विचारमंच यांच्या सूत्रबद्ध नियोजनातून ही स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे.

या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती सौ.राजश्री अविनाश पिंगळे द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्यां वाघोले तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी सौ.अर्चना सुरेश गिराम.या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ.सुवर्णा नागनाथ धांडे,सौ.स्वाती सतीश गायकवाड,सौ.वर्षा लहू बागलाने,सौ.श्रद्धा धर्मेश पिंगळे,सौ.शोभा विकास मुळे,सौ.सोनाल विकास साळवे,सौ सपना गणेश धर्माधिकारी या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बीएच.एम.एस.कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे,यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन निवेदक सुरेश साळुंकेंनी केले,या कार्यक्रमास महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

पान ६ वरून...

## सत्ताविस वर्षांपासून

दादासाहेब गिरी यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली

यावेळी जयभवानी ग्रुपचे अध्यक्ष अनिल खाडेकर, रजित काबंळे,पिटु साळवे.शंकर शिदे, सदाशिव भाले,दिपक अवघड,राजेंद्र तापडीया, शेख बाबा,शेख मुददशीर, शेख नसिर, शेख ईर्शाद,विनायक गिरी,विक्रम गिरी,प्रभु सुतार, संतोष सावंत,अविनाश पंडीत,सचिन गिरी, दिनकर सुतार, संतोष सोनट्टके,दत्ता धुरंधरे, अनिल काबळे, पप्पु थोरात,साईनाथ पाटोळे,महेश सुर्यवंशी,लाला सुर्यवंशी, आकाश सुतार आदि उपस्थित होते

संजयनगर येथे १९९७ पासुन ते आज पर्यंत दुर्गा महोत्सव साजरा करण्यात येतो यासाठी याभागाचे सामाजिक कार्यक्रते मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यानी १९९७ ला पहिल्यांदा संजयनगर भागातील सर्व जाती धर्मातील नागरीकांना एकत्र करून नवरात्र महोत्सवात जय भवानी दुर्गात्सव समीतीची स्थापना करून आज तब्बल २७ व्या वर्षात सुध्दा त्याच जोशात नवरात्र महोत्सव साजरा होत आहे

संजयनगर भागातील गोरगरीब नागरीक गेली २७ वर्षां पासुन विना वर्गणी नवरात्र महोत्सव साजरा होत आहेत जयभवानी ग्रुपचे सर्व सदस्य आप आपल्या परिस्थिती प्रमाणे वर्गणी जमा करून दुर्गात्सव साजरा करतात यासाठी महिला सुध्दा सहभाग घेऊन नवरात्र महोत्सव साजरा करत आसतात

## महसुल विभागात निवडणूक

मी २००४ मध्ये आष्टी तहसिल कार्यालयात रूजू होऊन जालना, अंबड,मंठा येथे नोकरी करून मी २०१४ ला पुन्हा आष्टी येथे कार्यरत झालो आणि येथेच मला सेवा निवृत्ती मिळाली आहे.या नोकरीच्या कामातून निष्कलंक बाहेर पडत असल्याचा आनंदही मला झाला असल्याचे पवार यांनी सांगितले.यावेळी उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुध्दे,सभापती सुरेश वारंगुळे,महसूल संघटनेचे अध्यक्ष शरद शिंदे,शिवसेना नेते जालिंदर पांढरे,क-हेवाडीचे माजी सरपंच जालिंदर गायकवाड यांच्यासह तलाठी,मंडळधिकारी,तहसिल कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वानंद थोरवे यांनी करून आभार मानले.

## साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे

तहसील पर्यंत काढण्यात आला सासीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे कार्य हे उपेक्षीत दिन दलीत समाजाचे उन्नती करता होते साहीत्य व लोकशाहीरीतुन समाजात जागृती करण्याचे काम केले. त्याचे कार्याचा सन्मान सर्वोच्य भारतरत्न हा पुरस्कार देऊन करावा या मागणीचे निवेदन प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांना देण्यात आले. यावेळी प्रमुख कार्यकर्त्यांनी आपले विचार व्यक्त केले. घोषणाणी तहसील परीसर दणाणूण गेला होता या मोर्चात मानवी हक्क अभियानचे तालूकाध्यक्ष कैलास आडागळे. युवा नेते सुरज लोखंडेआशोक पाटुळे, रामकिसन लोखंडे, अमोल लोखंडे, महादेव लोखंडे, अभिषेक आडागळे, ज्ञानोबा पाटुळे, धर्मराज लोंखडे, दिलीप लोखंडे, किरण लोंढे, माणीक लोखंडे, अमोल पाटुळे, सचिन पाटुळे, सह सकल मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जगदंबा माता नवरात्र

या ऊत्सवात वडवणी तालुक्यातील व शहरातील भावीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मंडळाला सहकार्य करावं आसे आवाहन अध्यक्ष सचिन मस्के सह पदाधिकारी यांनी केले आहे.नवरात्र मोहत्सवाच्या अध्यक्षपदी सचिन मस्के, उपाध्यक्षपदी प्रमिलाताई माळी, गणेश सोनटक्के,सचीव गणेश मोतुळे, खजीनदार गणेश कळसकर , गोपाल डोरले,कार्याध्यक्ष संतोष बहिरे,मुर्ती रक्षक रोहन मोतुळे व सोहम घुमरे,सोशल मिडिया प्रमुख ओम घोडके,सौरब ऊगले,ऊत्तम नियोजन गणेश घुमरे,किशोर लोखंडे,बाळू शिंदे,यांच्या निवडी एकमताने करण्यात आल्या.तर मार्गदर्शक म्हणून पत्रकार सतीश मुजमुले, कैलास दुधाने,बळीराम नागरगोजे,दिलीप रोकडे, बप्पा घाडगे,निवांत दराडे,दत्ता कुरकुटे,सुनिल शिनगारे,लतीबे सर,घुले सर, सिद्धेश्वर कवचट,भयासाहेब वाघमोडे,लखन वाघममोडे, संतोष मस्के हे सर्व मार्गदर्शकाच्या भुमीकेत आसनार आहेत.

## घरकुलाच्या थकीत हप्त्यासाठी

मागण्यांची निवेदन गटविकास अधिकारी मुळीक मॅडम यांना देण्यात आले.केंद्र सरकारकडूनच निधी उपलब्ध होताच लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम पाठवण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले.यावेळी शेतमजुरी युनियन यांची जिल्हा सेक्रेटरी शांतीलाल पाटेकर,दत्ता डाके, शिवाजी कुरे,सय्यद रजाक,बंडू गरड, बंडूराम गरड , रत्नाकर गोलेकर, अशोका गाढे, पांडुरंग उबाळे, नितीन पवार यांच्यासह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर प्रतीक्षा संपणार, पीएम किसानचा १८ वा हप्ता ५ ऑक्टोबरला होणार जमा

## ९.५ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी येणार, मोदी स्वत: महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून शेतकऱ्यांच्या खात्यावर दरवर्षी ६ हजार रुपये पाठवले जातात. केंद्र सरकारच्या योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात एका हप्त्यात २ हजार रुपयांप्रमाणं तीन हप्त्यांमध्ये ६ हजारांची रक्कम पाठवते. केंद्र सरकारनं ही योजना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी जाहीर केली होती. या योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात आतापर्यंत १७ हप्त्यांमध्ये ३४ हजारांची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. आता पीएम किसान सन्मान योजनेचा १८ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात ५ ऑक्टोबरला वर्ग करण्यात येणार आहे. १८ व्या हप्त्याचा वितरण सोहळा महाराष्ट्रात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी वाशिम जिल्ह्यातील कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग करणार आहेत. ९.५ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी रुपये पाठवले जाणार आहेत.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील माहितीनुसार १८ व्या हप्त्याचा वितरण सोहळा महाराष्ट्रात होणार आहे. विदर्भातील जिल्हा असलेल्या वाशिममध्ये हा वितरण सोहळा होणार आहे. ५ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका कार्यक्रमात



शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम वर्ग करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर या निमित्तानं येणार आहे. नरेंद्र मोदी ४-५ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असण्याची शक्यता आहे. मुंबईतील मेट्रो ३ चं देखील उद्घाटन नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

पीएम किसान सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना तीन हप्त्यांमध्ये सरकारकडून २ हजार रुपये दिले जातात. सध्या शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान योजनेचे १७ हप्ते मिळालेले आहेत. आता १८ व्या हप्त्याची रक्कम मिळवण्यापूर्वी ई केवायसी करुन घेणं आवश्यक आहे. ई केवायसी जे शेतकरी करणार नाहीत त्यांना २ हजार रुपयांचा हप्ता मिळणार नाही. त्यामुळं शेतकऱ्यांनी ई केवायसी करुन घेणं आवश्यक आहे.

पीएम किसान सन्मान योजनेचा लाभ घेणारे शेतकरी ई केवायसी त्यांच्या मोबाईलवरुन किंवा नागरी सुविधा केंद्रात जाऊन करु शकतात. मोबाईलवरुन पीएम किसान सन्मान योजनेच्या वेबसाईटला भेट द्या. तिथं तुम्ही ई केवायसी हा पर्याय निवडा. हा पर्याय निवडल्यानंतर शेतकऱ्यांना आधार क्रमांक नोंदवावा लागेल. त्यानंतर ओटीपी मिळेल. तो ओटीपी क्रमांक पीएम किसानच्या वेबसाईटवर नोंदवल्यानंतर तुम्हाला ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण करता येईल. दरम्यान, शेतकऱ्यांना ई केवायसी सोबत आधार बँक खातं लिंक करावं लागेल. याशिवाय जमीन पडताळणी प्रक्रिया देखील पूर्ण करावी लागणार आहे. ई केवायसी, आधार बँक खाते लिंक आणि जमीन पडताळणी करणाऱ्या शेतकऱ्यांना पीएम किसानचे पैसे मिळतील.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९१ : फ्रेन्च संसदेचे पहिले अधिवेशन सुरू
१८३७ : भारतातील पहिले टपाल कार्यालय सुरू झाले.
१८६९ : साली ऑस्ट्रिया देशांत जगात पहिल्यांदा पोस्टकार्ड चा वापर करण्यात आला.
१८८० : थॉमस एडिसनने विद्युत दिव्यांचा कारखाना सुरू केला.
१८९१ : स्टॅनफोर्ड विद्यापीठाची स्थापना
१९४३ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी नेपल्स शहरावर ताबा मिळवला.
१९४६ : युनायटेड किंग्डममधे 'मेन्सा इंटरनॅशनल' या संस्थेची ची स्थापना झाली.
१९४९ : साली जनरल माओ त्से तुंग यांनी चीन लोकशाही वादी गणराज्य(पीपुल्स रिपब्लिक आफ़ चाइना)ची घोषणा केली.
१९५३ : साली भाषांवर आधारित भारतातील पहिले तेलगु भाषिक राज्य आंध्रप्रदेश राज्याची स्थापना करण्यात आली.
१९५८ : भारतात दशमान (मेट्रिक) पद्धत वापरण्यास सुरूवात झाली.
१९५९ : भुवनेशप्रसाद सिन्हा यांनी भारताचे ६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९६० : नायजेरियाला (युनायटेड किंगडमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६९ : कॉनकॉर्ड विमान प्रथमच ध्वनीगती पेक्षा जोरात उडण्यात यशस्वी झाले.
१९७१ : अमेरिकेतील वॉल्ट डिस्ने वर्ल्ड सुरु झाले.
१९८२ : सोनी कंपनीने पहिले कॉम्पॅक्ट डिस्क प्लेयरप्रकाशित केले.
१९९२ : कार्टून नेटवर्क सुरु झाले.
२००२ : भारतीय दंड संहिता, मोटार वाहन कायदा, १९८८ आणि मुंबई प्रतिबंधक कायदा १९४९ अंतर्गत सलमान खान वर गुन्हा दाखल. तसेच मुंबई पोलिसांनी सलमान विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०४(भाग-२) अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला.
२००५ : इंडोनेशियातील बाली बेटांवर बॉम्बस्फोटांत १९ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४७ : ॲनी बेझंट थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे सखोल अध्ययन केले होते. त्यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांची ग्रंथसंख्या सुमारे ४५० इतकी आहे. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली. (मृत्यू: २० सप्टेंबर १९३३)
१८८१ : विल्यम बोईंग बोईंग विमान कंपनीचे संस्थापक (मृत्यू: २८ सप्टेंबर १९५६)
१८९५ : लियाकत अली खान पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: १६ आक्टोबर १९५१)
१९०६ : सचिन देव बर्मन संगीतकार व गायक (मृत्यू: ३१ आक्टोबर १९७५)
१९१९ : गजानन दिगंबर तथा ग. दि. माडगूळकर गीतकार, कवी, लेखक, पटकथाकार, अभिनेते. गीतरामायणामुळे त्यांना 'महाराष्ट्राचे वाल्मिकी' म्हणून ओळखले जाते. (मृत्यू: १४ डिसेंबर १९७७)
१९१९ : मजरुह सुलतानपुरी दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९९३) शायर, गीतकार आणि कवी (मृत्यू: २४ मे २०००)
१९२४ : जिमी कार्टर अमेरिकेचे ३९ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते
१९२८ : विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन दाक्षिणात्य अभिनेते (मृत्यू: २१ जुलै २००१)
१९३० : जयदेवप्पा हलप्पा तथा जे. एच. पटेल कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (३१ मे १९९६ ७ आक्टोबर १९९९) (मृत्यू: १२ डिसेंबर २०००)
१९४५ : साली भारतीय राजनीतिज्ञ व भारताचे विद्यमान १४ वे राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६८ : मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) थायलंडचा राजा (जन्म: १८ आक्टोबर १८०४)
१९३१ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' नाट्यछटाकार (जन्म: १८ जानेवारी १८८९)
१९५९ : इटलीचे पहिले अध्यक्ष इरिको डी निकोला यांचे निधन. (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९९७ : गुल मोहम्मद जगातील सर्वात बुटकी व्यक्ती (२२.१'')

# सुक्ष्म सिंचनाच्या २०० कोटी रुपयांच्या अनुदान वितरणाला मान्यता



पुणे : राज्य सरकारने सूक्ष्म सिंचन २०० कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यासाठी मंजूरी दिली आहे. त्याबाबतचा शासननिर्णय राज्य सरकारने २७ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केला आहे. या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना २०० कोटी रुपयाचे अनुदान वितरित करण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्याकडून प्रति थेंब अधिक पीक सूक्ष्म घटकासाठी ६६७ कोटी ५० लाख रुपये निधीला यापूर्वीच मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय कृषी विकास योजना कॅफेटेरिया अंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गसाठी केंद्र सरकारचा हिस्सा १२० कोटी ४९ लाख रुपये वितरित केला आहे. त्यामध्ये ८० कोटी ३२ लाख रुपये राज्य सरकारचा हिस्सा आहे. त्यातून २०० कोटी रुपयांच्या निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ महा डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. लाभार्थी शेतकऱ्यांचं अनुदान वाटप आधार संलग्न बँक खात्यावर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सूक्ष्म सिंचन योजनेचं अनुदान पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. दरम्यान, २०२२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना या योजनेचं नाव राष्ट्रीय कृषी विकास योजना कॅफेटेरिया करण्यात आलं आहे. या योजनेत वार्षिक कृती आराखडा आधारित आणि सविस्तर प्रकल्प अहवाल आधारित या दोन घटकांचा समावेश आहे. प्रति थेंब अधिक पीक हा घटक याच योजनेत घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के आणि राज्य सरकरचा ४० टक्के हिस्सा ठरवण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकानुसार अनुदान वितरणास मान्यता देण्यात आली आहे.

# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.



उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे :

उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी :

आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही

बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# केळीमधील करपा, सीएमव्ही रोगांचे नियंत्रण

राज्यातील बहुतांश भागात जुलै- ऑगस्ट महिन्यांत चांगला पाऊस झाला आहे. दरम्यान, सप्टेंबर महिन्यात पावसाने उघडीप दिली आहे. जून लागवडीच्या केळी बागा सध्या जलद वाढीच्या अवस्थेत असून पावसामुळे बागेत तणांचा प्रादुर्भाव वाढून माती घट्ट झाली असेल. अशा बागेत कुळव किंवा पॉवर टिलरने जमीन भुसभुशीत करून घ्यावी. सततच्या पावसामुळे केळी बागेत करपा (सिगाटोका) रोगाची लक्षणे दिसू लागली आहेत. तसेच कुकुंबर मोझॅक या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करणाऱ्या मावा किडीसाठी पोषक हवामान स्थिती तयार झाली आहे. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी लवकरात लवकर रोग नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे.



कुकुंबर मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) : हा विषाणूजन्य रोग असून हरितद्रव्याचा लोप हे या रोगाचे मुख्य लक्षण आहे. सुरुवातीस कोवळ्या पानांच्या शिरांतील हरितद्रव्य लोप पावते. त्यामुळे पानांवर पिवळसर पट्टे दिसतात. हे पट्टे तुटक तुटक किंवा संपूर्ण पानांवर आढळून येतात. कालांतराने पानांच्या शिरांमधील भाग काळपट पडून तेथील ऊती मृत पावतात व पाने फाटतात. पानांचा पृष्ठभाग आकसतो. पानाच्या कडा वाकड्या होऊन पाने जवळ येतात. पानांच्या शिरा ताठर होऊन संपूर्ण पान कडक होते. रोगाची तीव्रता वाढल्यास, पोंग्याजवळील पाने पिवळे पडून पोंगा सडतो. झाडाची वाढ खुंटते.

प्रसार : प्राथमिक प्रसार रोगग्रस्त लागवड साहित्याचा वापर. दुय्यम प्रसार मावा या किडीमार्फत होतो. यात प्रामुख्याने ॲफिस गॉसिफी (कपाशीवरील मावा) व होपॅलोसीफम मेडीस (मक्यावरील मावा) या महत्त्वाच्या प्रजाती आहेत. तसेच मायझस परसीकी, ॲफिस क्रॅसीव्होरा, मॅक्रोसीफम पीसी आणि होपॅलोसीफम पुनीफोलियम या प्रजाती देखील या रोगाच्या विषाणूचा प्रसार करतात. या विषाणूची सुमारे १००० यजमान पिके आहेत. यात प्रामुख्याने काकडीवर्गीय पिके जसे कलिंगड, टोमॅटो व वेलवर्गीय पिके, मका, उडीद, मूग, चवळी आणि विविध तणांचा समावेश होतो.

अनुकूल हवामान : बदलत्या हवामानामुळे रस शोषणाऱ्या किडीच्या (मावा) संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सततचे ढगाळ वातावरण, जुलै- ऑगस्ट महिन्यात झालेला भरपूर पाऊस, कमी झालेले तापमान (२४ अंश सेल्सिअस) व वाढलेली आर्द्रता या बाबी मावा किडीच्या वाढीस पोषक असतात. व्यवस्थापन : विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर त्याच्या नियंत्रणासाठी कोणतेही ठोस उपाय करता येत नाहीत. तथापि रोगाचा प्रसार रोखण्यासाठी काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रादुर्भावग्रस्त झाडे मुळासकट उपटून बागेपासून दूर ठिकाणी जाळून किंवा गाडून नष्ट करावीत. बागेचे नियमित निरीक्षण करून रोगग्रस्त झाडे आढळल्यास त्वरित काढून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. बागेतील तसेच बांधावरील सर्व प्रकारची तणे काढून स्वच्छता ठेवावी. केळी बागेत काकडीवर्गीय तसेच टोमॅटो, मिरची, वांगी या पिकांची लागवड करू नये.खत व्यवस्थापन : मृग बागेस जमिनीतून खतमात्रा देताना प्रति झाड ८२ ग्रॅम युरिया व ८३ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश प्रमाणे द्यावे. ठिबक सिंचनातून खत देताना प्रति एक हजार झाडांना ४.५ किलो युरिया ६.५ किलो मोनोअमोनियम फॉस्फेट आणि ३ किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.

नवीन लागवड : ऑक्टोबर हा केळी लागवडीचा शिफारशीत महिना आहे. या महिन्यातील लागवडीच्या दृष्टीने ऊती संवर्धित रोपे वेळेवर उपलब्ध होतील. त्या प्रमाणे रोपांची उपलब्धता करावी. लागवडीच्या निवडलेल्या क्षेत्रात पूर्वतयारी करून घ्यावी. लागवड गादी वाफ्यावर करावी. रानाची आखणी झाल्यावर ठिबक सिंचन संचही बसवून घ्यावा.करपा : सततचा पाऊस, दवबिंदू, उष्ण व दमट हवामानात या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. रोगाचा प्रादुर्भाव प्रथम झाडांच्या खालील पानांवर आढळून येतो. बुरशीच्या प्रादुर्भावामुळे पानांवर, पानांच्या शिरेस समांतर बारीक पिवळसर लांबट गोल ठिपके दिसून येतात. कालांतराने ठिपके वाढून वाळून जातात. त्याचा रंग तपकिरी काळपट होऊन मध्यभागी राखाडी होतो. रोगास अनुकूल हवामान स्थिती दीर्घकाळ टिकून राहिल्यास ठिपके एकमेकांत मिसळून पाने टोकाकडून करपतात.

रोगाचा प्रसार : करपा रोगाच्या बुरशीचे लैंगिक आणि अलैंगिक बीजाणूंमुळे रोगाची सारखीच लक्षणे उद्भवतात. हे दोन्ही प्रकारचे बिजाणू पानाच्या खालच्या बाजूने पर्णरंध्राच्या पेशीत शिरकाव करून रोगाची लागण करतात. अलैंगिक बीजाणूंची निर्मिती ओलसर वातावरणात सतत चालू असते. त्यांचा प्रसार पानावर पडणारा पाऊस अथवा दवबिंदूद्वारे होतो. अशी पाने पावसामुळे धुतली जात असताना मुख्य झाडाखाली वाढणाऱ्या पिलावर या बुरशीचे बिजाणू पडून पिलावर रोगाची लागण होते. त्यामुळे खोडवा बागेत या रोगाचे प्रमाण अधिक दिसते. लैंगिक बीजाणूंची निर्मितीसुद्धा अलैंगिक बीजाणूंच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या त्याच ठिपक्यांमध्ये होते. मात्र त्यांची लक्षणे पुढील काळात किंवा कालांतराने दिसून येतात. हे लैंगिक बीजाणू पावसामुळे किंवा दवबिंदूमुळे निर्माण झालेल्या ओलसर वातावरणात वेगाने बाहेर पडतात. पोषक तापमान आणि आर्द्रता असेपर्यंत हे बिजाणू रोग निर्मितीचे कार्य करत असतात. तसेच हे बिजाणू पावसाचे पाणी, जोराचा वारा यामुळे लांब अंतरावर वाहून नेले जातात. त्यामुळे रोगाचा प्रसार अधिक जलद गतीने होतो.

नियंत्रणासाठी उपाय : बागेत पावसाचे पाणी साचून राहणार नाही आणि बाग कायम वाफसा स्थितीत ठेवावी. पाण्याचा योग्य निचरा होण्याची व्यवस्था करावी. बाग तसेच बांध कायम तणमुक्त, स्वच्छ ठेवावेत. मुख्य खोडाच्या बगलेत येणारी पिले नियमितपणे कापावीत. प्रति झाड २०० ग्रॅम नत्र, ६० ग्रॅम स्फुरद आणि २०० ग्रॅम पालाश याप्रमाणे रासायनिक खतांच्या वेळापत्रकानुसार मात्रा द्यावी. नत्राचा अतिरिक्त वापर टाळावा.

# रोटरीच्या वतीने माजलगावात मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील पत्रकार संघाच्या हरित माजलगाव या संकल्पने अंतर्गत रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल कडून दि ३० सप्टेंबर सोमवार रोजी माजलगाव शहराच्या मुख्य रस्त्यावर शहर पोलीस स्टेशन ते जुने बसस्थानका पर्यंत माजलगाव मतदार संघातील नेते माधव निर्मळ व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे हस्ते वृक्षारोपणच्या तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी माजी जि.प.सदस्य कल्याण आबूज, रोटरी अध्यक्ष पांडुरंग चांडक, सेक्रेटरी प्रभाकर शेटे,प्रोजेक्ट चेअरमन रो.इम्रान नाईक,सुदर्शन थावरे,इंजि.कृष्णा सोळंके,पत्रकार उमेश मोगरेकर, ज्योतीराम पांढरपोटे,विष्णू उगले,महेंद्र मस्के, अरविंद ओव्हळ यांच्यासह ईश्वर खुरपे,रो. अण्णासाहेब तौर, डॉ.सुनील गरड,रो. अंकुश राठोड,रो. नारायण गंडे,रो. विनोद जाधव,रो. कैलास यलशेट्टी, रो.उमाकांत सोळंके,रो.समीर, डॉ.एकनाथ भले, शेख अली पटेल, पार्श्वनाथ अंबुरे,बंडू अप्पा खुरपे,दिलीप रांदड इत्यादी उपस्थित होते. ऑफ रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलने पत्रकार संघ व छोटे व्यापारी यांचे सहकार्याने माजलगाव शहर व परिसर हरित करण्यासाठी शहराच्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे ठरवले असून



त्यातील पहिल्या टप्प्यात छ.शिवाजी महाराज चौक ते शहर पोलीस स्टेशन पर्यंत मागील महिन्यात वृक्षारोपण केले होते दुसऱ्या टप्प्यात शिवशारदा नगरीत वृक्षारोपण केले होते.आणि दि ३० सप्टेंबर सोमवार रोजी शहर पोलीस स्टेशन ते जुन्या बसस्थानका पर्यंत कोनो कोनोपार्कस आकाश मोगरा, मुकमोहिनी या उंच वाढणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण करून त्यास ट्री गार्ड (संरक्षक जाळी) बसवण्यात आल्या आहेत.या वृक्षारोपण मोहिमेत या मुख्य मोठे रस्त्यावरील व्यापारी गाड्यावरील छोटे छोटे व्यापारी यांचे हस्ते वृक्षारोपण करून त्यांना या झाडांचे संगोपन करण्यासाठी पालकत्व देऊन या झाडांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली. शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिकांचे असेच सहकार्य लाभले तर उर्वरित उपक्रमात बाबासाहेब आंबेडकर चौक ते मौलाना आझाद चौक पर्यंतचा मुख्य रस्ता व नवीन बसस्थानक ते छ. संभाजी महाराज चौक या मुख्य रस्त्यावर याच सिझन मध्ये वृक्षारोपण पूर्ण करण्याचा मानस रोटरी क्लब सेंट्रल चे अध्यक्ष पांडुरंग चांडक व प्रभाकर शेटे यांनी व्यक्त केला आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या धारूर शहराध्यक्षपदी तरुण तडफदार ॲ.शेख शहादाब यांची निवड करण्यात आली खासदार बजरंग सोनवणे यांनी पवनसुत या निवासस्थानी नियुक्तीपत्र देऊन निवड केली.धारूर शहरातील वकील व्यावसायिक करणारे शेख शहादाब यांची राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शहराध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.शरद पवार यांचे विचार जनसामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम करणार असल्याचे भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या तर अल्पसंख्यांक सेलच्या तालुका अध्यक्षपदी फेरोज सय्यद व अल्पसंख्यांक सेलच्या शहराध्यक्षपदी समीर शेख यांची निवड करण्यात आली.नवनियुक्त पदाधिकारी यांचे खासदार बजरंग सोनवणे यांनी स्वागत केले.तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष युराज लगड व युवक तालुका अध्यक्ष गणेश थोरात यांनी अभिनंदन केले शुभेच्छा दिल्या यावेळी ॲड विश्वास शिनगारे,ॲड अमोल साखरे, ॲड सूरज नखाते, ॲड राज नयकोडे, संभाजी तीबोले, राहुल फुन्ने, समीर शेख व मोठ्या संख्येने मित्रपरिवार उपस्थित होता.



## धारूर शहराध्यक्षपदी ॲड. शेख शादाब यांची निवड

धारूर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या धारूर शहराध्यक्षपदी तरुण तडफदार ॲ.शेख शहादाब यांची निवड करण्यात आली खासदार बजरंग सोनवणे यांनी पवनसुत या निवासस्थानी नियुक्तीपत्र देऊन निवड केली.धारूर शहरातील वकील व्यावसायिक करणारे शेख शहादाब यांची राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शहराध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.शरद पवार यांचे विचार जनसामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम करणार असल्याचे भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या तर अल्पसंख्यांक सेलच्या तालुका अध्यक्षपदी फेरोज सय्यद व अल्पसंख्यांक सेलच्या शहराध्यक्षपदी समीर शेख यांची निवड करण्यात आली.

नवनियुक्त पदाधिकारी यांचे खासदार बजरंग सोनवणे यांनी स्वागत केले . तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष युराज लगड व युवक तालुका अध्यक्ष गणेश थोरात यांनी अभिनंदन केले शुभेच्छा दिल्या यावेळी ॲड विश्वास शिनगारे,ॲड अमोल साखरे, ॲड सूरज नखाते, ॲड राज नयकोडे, संभाजी तीबोले, राहुल फुन्ने, समीर शेख व मोठ्या संख्येने मित्रपरिवार उपस्थित होता.

## अध्यक्षपदी सतीश गरुड तर उपाध्यक्षपदी दिलीप बंडे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव येथे भावसार समाजाचे आराध्य दैवत असलेल्या हिंगलाज माता देवी प्राणप्रतिष्ठा व घटस्थापना भावसार समाज सभागृह येथे करण्यात येथे भावसार समाज बांधव हिंगलाज माता नवरात्र उत्सव विविध सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रम व स्पर्धा होणार असुन सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी नवरात्र महोत्सव समितीचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी आयोजन करण्यात येते याही वर्षी समाजातील ज्येष्ठ सभासद यांच्या मार्गदर्शना खाली सर्वांच्या मते सतीश गरुड अध्यक्षपदी तथा दिलीप बंडे उपाअध्यक्षपदी म्हणून निवड करण्यात आली तसेच कार्यकारणी पुढील प्रमाणे निवड करण्यात आली त्यामध्ये अध्यक्ष:- सतीश गरुड उपाध्यक्ष :- दिलीप बंडे सचिव :- गणेश पतंगे,संतोष लोखंडे. प्रदीप भावसार,चंद्रकांत बुलबुले,दत्ता गर्जे,बालाजी भायेकर,रामेश्वर कुटे, डीगांबर गरुड,सुनील पूरबुज,रामकृष्ण खेडकर,श्रीराम कळसकर,दत्तात्रय गरुड,लक्ष्मीकांत भावसार,बालाजी गरुड,सुधाकर गरुड गजानन खोले,निलेश कुटे,कुणाल पुरबुज,कुमार कुटे कुणाल कळसकर,ओम भायेकर व मोठ्या संख्येने ज्येष्ठ सभासद उपस्थित होते.

## ज्ञान हीच खरी शक्ती आहे हे विद्यार्थी व पालकांनी ओळखावे -डॉ.धारूरकर

माजलगाव । प्रतिनिधी

आजच्या २१व्या शतकात सत्ता, संपत्ती या गोष्टी तुमच्या कामाला येणार नाहीत तर पुढच्या पिढ्या घडविण्यासाठी ज्ञान मिळवण्याचा ध्यास ठेवला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर चे माजी कुलगुरू डॉ वि. ल. धारूरकर यांनी केले.ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. संजय शिंदे, भा. शि. प्र. संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, स्थानिक पदाधिकारी सुरेंद्र रेदासनी, ऍड. विश्वास जोशी, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, महिला व पुरुष पालक प्रतिनिधी सुरेश कोरडे यांची प्रमुख उपस्थिती होती.




या वेळी बोलतांना डॉ वि. ल. धारूरकर यांनी पालक व विद्यार्थी यांनी महाविद्यालयाने दिलेल्या सुविधांचा लाभ घ्यावा असे म्हटले. प्रमुख पाहुणे डॉ. संजय शिंदे यांनीही पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधताना जगताना वेळेच्या मर्यादा लक्षात घ्यायला सांगितले. आजचा काळ आवाक्याबाहेरचे स्वप्न पाहण्याचा नाही तर जगाचा व्यवहार व विचार लक्षात घ्या असे सांगीतले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांनी केले.पद्य संबोधी माने हिने सादर केले. या वेळी प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांनीही पालक व विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले. या प्रसंगी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेतील द्वितीय क्रमांक प्राप्त कु. कोमल तौर आणि निबंध स्पर्धा विजेती कु. अनुष्का कसबे यांचा तसेच बारावी व अकरावी स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. पालकांच्या वतीने सुरेश कोरडे आणि सौ. लक्ष्मी माने यांनी मनोगत व्यक्त करताना कॉलेजच्या सर्व सोयी, विद्यार्थ्यांवर असणारे वैयक्तिक लक्ष याबद्दल समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना स्थानिक कार्यवाह विश्वासराव जोशी यांनी म्हटले की शिक्षक- पालक-विद्यार्थी या त्रिसूत्रीने आपण अजून आपणाला अजून प्रगतीकडे व्यक्त केले. मान्यवरांचे आभार व शांतिमंत्र पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री यांनी सादर केले. सूत्रसंचालन प्रा लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. या मेळाव्याला बहुसंख्य पालक,प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## माजलगावचा स्वप्नील इंदानी एमपीएससी परीक्षेत यशस्वी

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव येथील संप्नील जितेंद्र इंदानी या युवकांने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत २६८ वि रॅंक मिळवली.स्वप्नीलचे माजलगावच्या श्री सिद्धेश्वर विद्यालयात माध्यमिक व लातूर च्या विवेकानंद महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले आहे. तो इलेक्ट्रॉनिक इंजिनियर असून कसलेही क्लासेस न लावता स्वयं अध्ययन द्वारे घरीच अभ्यास करून ही परीक्षा पास झाला.

त्याच्या या यशाबद्दल माजलगाव माहेश्वरी सभेचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया, सचिव गोपाल मानधने, गोविंद बजाज, राजेंद्र इंदानी, जुगलकिशोर झंवर,संतोष जेथलिया, प्रा कमलकिशोर लड्डा,विकास मालानी,डॉ संदीप मुंदडा,विवेक बजाज, विवेक मुंदडा, गणेश लोहिया, डॉ आनंद राठी, बालकिशन झंवर, डॉ सीताराम इंदानी यांनी यतोचित सत्कार केला.शहरात सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

## धारूरच्या प्रीती वाघमारेची नांदेड पोलीसमध्ये निवड

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील कसबा विभागामध्ये राहणारी प्रीती मधुकर वाघमारे हिची घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूलअसताना जिद्दने शिक्षण शिक्षण पूर्ण केले. शिक्षणा सोबत तीने पोलीस भरतीची तयारी सुरू केली होती . नांदेड पोलीस भरती प्रक्रिया मध्ये तिने अर्ज केला,रात्रंदिवस मेहनत करून प्रीती ने जिद्दीने यश संपादन केले तिची नांदेड पोलीस मध्ये निवड झाली आहे.

प्रितीच्या घरची परिस्थिती बेताचीच असल्याने धारूरच्या जनता विद्याल्यातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करून महाविद्यालयीन शिक्षण राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर येथे शिकत असताना पोलीस भरती ची तयारी सुरू केली मध्येच वडिलांचे छत्र हर्वल्यामुळे तिच्या सर्व आशा अपेक्षा व स्वप्न हिरवली गेली.तिच्या वडिलांनी इच्छा होती की लेकिन पोलीस भरती व्हावे त्यासाठी नेहमीच ते प्रीती ला प्रोत्साहन देत असत वडिलांचे छत्र



हरवले.पण तिच्या वडिलांनी वाहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रीतीच्या आईने मोठ्या हिमतीने तिला पोलीस बनवण्यासाठी कष्ट घेतले बाजार पेठेत विविध फळांची विक्री करून कुटुंब सांभाळून लेकीला पोलीस बनवले. प्रीतीची नांदेड पोलीस मध्ये निवड झाल्याबद्दल सर्वत्र तिचे कौतुक होत आहे प्रीतीच्या या यशामध्ये आई बहीण व भाऊ यांचे मोठे योगदान असल्याचे प्रीतीने सांगितले तसेच पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र चे प्रशिक्षक यांनीही मोलाचे सहकार्य केल्याच्या भावना प्रीतीने व्यक्त केल्या.

प्रितीच्या वडिलांचे छत्र हरवले आईने हातगड्यवर विविध फळे विक्री करून लेकीला बनवले पोलीस

*प्रीतीचे वडील फळ विक्री करून आपले कुटुंब चालवत होते प्रीतीने पोलीस व्हावे त्यांची इच्छा होती म्हणून आईनेही फळ विक्रीचा व्यवसाय करून एका मुलीचे शिक्षण ,लग्न केले तर प्रीतीला पोलीस बनण्यासाठी मोठे पाठबळ व प्रोत्साहन देऊन लेकीला पोलीस बनवण्याचे स्वप्न पूर्ण केले पोलीस बनण्यासाठी भाऊ अमोल ने ही नेहमीच पाठबळ दिल्याने मी हे यश संपादन केल्याचे प्रीती सागितले.

## जनसन्मान यात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित रहा -जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी



मतदार संघासाठी माजलगाव या ठिकाणी महायुती सरकारने नागरिकांसाठी राबवलेल्या विविध योजनांचा सर्व सामान्य मतदारांशी संवाद साधण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार हे दिनांक ०१ऑक्टोबर रोजीच्या जनसन्मान यात्रेस संबोधित करणार आहेत तर या जनसन्मान यात्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने महिलांसाठी लेक लाडकी योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजना,बेरोजगार युवकांसाठी मुख्यमंत्री युवा कौशल्य रोजगार योजना अशा विविध कल्याणकारी योजनांचा जनतेसमोर लेखाजोखा मांडण्यासाठी माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश (दादा) सोळंके व माजी जि.प. सभापती जयसिंग (भैय्या) सोळंके यांनी जनसंवाद यात्रेचे आयोजन दि. ०१ ऑक्टोबर रोजी मंगलनाथ मैदान या ठिकाणी आयोजन केले आहे तरी या जनसन्मान यात्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

## विकास राठोडने लांब उडीमध्ये मिळविले यश



परळी । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व गटशिक्षणाधिकारी कार्यालय परळी त्यांच्या संयुक्त विद्यमानाने परळीत आयोजित क्रीडा स्पर्धेमध्ये राजस्थानीज पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी खेळात लांब उडी स्पर्धेत विजय संपादन केल्याबद्दल पोदार शाळेत क्रीडाशिक्षक विलास आरगडे, मारुती कांबळे, अनिल शिंदे, सिताराम कराड यांच्या हस्ते या विजयी विद्यार्थ्यांच्या सत्कार करण्यात आला.

यावेळी शाळेचे ॲकॅडमी डायरेक्टर बीपी सिंग, प्रिन्सिपल मधु सिंग ह्या उपस्थित होत्या. तालुकास्तरीय लांब उडी स्पर्धेत यश मिळवून जिल्हा स्पर्धेत परळी तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे.

यामुळे विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आलाया कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

क्रमांक. २०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि- २२३
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. ०४/०९/२०२४

जाहिरनामा

जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे, चारदरी ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्रीम. मुंडे सावित्रा बालासाहेब रा. चारदरी ता. धारुर जि. बीड यांचा जन्म दिनांक ०५/१०/२००२ रोजी मौजे, चारदरी ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहू जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. ०४/०९/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला

आदेशावरुन
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार, धारुर धारूर

## निर्वाण म्हणजे मृत्यू नव्हे,जिवंतपणीच विकारमुक्तीची अवस्था: भिक्खु धम्मशील थेरो

माजलगाव । प्रतिनिधी

निर्वाण म्हणजे मृत्यू पावणे नव्हे, तर जिवंतपणीच विकारविमुक्त मनाची अवस्था होय. धम्ममय जीवन जगताना मनात राग, द्वेष, मोह, ढोंगीपणा, कपटीपणा, इर्षा, अहंकार, दुष्टपणा, आळशीपणा या विकारातून मुक्त होणे म्हणजेच निर्वाण प्राप्त करणे होय. पद, पैसा, प्रतिष्ठा आणि नातेवाईक हे क्षणिक सुख देतात, मात्र जाताना दुःखच देतात त्यामुळे त्यांची आपण आसक्ती ठेवू नये. लोककल्याणाची व परोपकाराची भावना नेहमी ठेवावी, यातच मानवाचे कल्याण सामावलेले आहे. निर्वाणशिवाय मंगल नाही ते प्राप्त करण्यासाठी आपण सन्मार्गाने जायला हवे बुद्ध हे केवळ मार्गदाता असून त्या मार्गावर चालण्याचे काम आपणच करावे लागते, असा संदेश पूजनीय भिक्खु धम्मशील थेरो यांनी रविवारी दि. २९ सप्टेंबर येथील तिर्थस्थळ श्रावस्ती बुद्ध विहार येथे आयोजित 'मानवी जीवनात बुद्ध धम्माचे महत्त्व' या विषयावरील धम्मदेसनेत दिला.

या वेळी माजी मंत्री आमदार प्रकाश सोळंके, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे,लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखान्याचे उपाध्यक्ष जयसिंह सोळंके, कृ.उ.बा



समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे,कृ.उ.बा समितीचे सभापती जयदत्त नरवडे, कचरू खळगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रविवारच्या पूजेच्या यजमान माजी जि.प.समाज कल्याण सभापती गयाबाई एकनाथराव आव्हाड ह्या होत्या.यांच्या वतीने उपासकांना भोजनदान देण्यात आले.या वेळी माजी नगरसेविका सुधामती पौळ व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने श्रावस्ती बुद्ध विहारास भिक्खु धम्मशील थेरो यांना सुसज्ज असे सागवानी आसन दान देण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. दशरथ मकसरे यांनी केले. प्रास्ताविक सदाशिव भालेराव यांनी तर आभार श्याम वाघमारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास सद्धम्म सेवासंघाचे भगवानराव सातपुते,सोपान उजगरे,पांडुरंग जाधव,एन.जी शिनगारे, जी.एन. घनगाव,रविकांत उघडे,लीलाबाई उजगरे,वाल्हाबाई टाकणखार,विजय होळीकट्टी यांची उपस्थिती होती. तसेच भीमराव टाकणखार,सुशांत पौळ,पद्माकर रुचके,नवनाथ गायकवाड, भगवान जाधव, भीमराव कांबळे सह हजारो उपासक उपस्थित होते.

विहारास उर्वरित निधी लवकरच तीन कोटी ८५ लाख रुपयाचा प्रारूप आराखड्यास मंजुरी घेतलेली असून त्यापैकी १ कोटी ७ लाख रुपयाची निविदा निघालेली असून लवकरच कार्यारंभ आदेश मिळतील. व उर्वरित मंजूर निधी लवकरच प्राप्त करू.

–प्रकाश सोळंके, आमदार

विहाराच्या विकासास कायम प्रयत्न

मागील काही वर्षांपूर्वीच्या धम्मकार्याचे गतवैभव भिक्खु धम्मशील थेरो यांच्या मुळे प्राप्त झाले आहे. श्रावस्ती बुद्ध विहाराच्या विकासासाठी या पुढेही श्रद्धापूर्वक प्रयत्न करू.

– बाबुराव पोटभरे, संस्थापक अध्यक्ष, बहुजन विकास मोर्चा

# जलयुक्त शिवार भ्रष्टाचार प्रकरणातील गुत्तेदार अन् अधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर बोजा टाका

## उपलोक आयुक्तांनी आदेश दिले असल्याची वसंत मुंडे यांची माहिती

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या कार्यकाळात ही योजना चालू झाली. परंतु सुरावती पासून जलयुक्त शिवार योजनेमध्ये महाराष्ट्रात करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झाला आहे असे अनेक चौकशीमध्ये महाराष्ट्रात सिद्ध झाले असून या योजनेमध्ये परळी विधानसभा मतदार संघातील जलयुक्त शिवाराच्या माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्या कार्यकाळात ३५ करोड रुपयांचा निधी मंजूर झाला. जल एक शिवार भ्रष्टाचार प्रकरणात परळी विधानसभा मतदारसंघ मधील महाराष्ट्र शासनाकडे तक्रार सन २०१८ ला दाखल केली. मा. लोक आयुक्तांच्या कार्यालयाकडे गेले सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी होऊन गेला असून सुनावणी चालू आहे. दि.२४/९/२०२४ च्या आदेशामध्ये मा. उपलोक आयुक्तांनी ३३निलंबित अधिकारी व गुत्तेदार सुशिक्षित बेकार अभियंता मजूर सहकारी संस्था एकूण १६९ वर तात्काळ मालमत्तेवर बोजा नोंदणी करून वसुली व अटक करण्याचे आदेश पारित केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष तक्रारदार वसंत मुंडे यांनी दिली. परळी विधानसभा मतदारसंघात १३३५ पेक्षा जास्त कामे झालेली नोंद असून ७५/ टक्के कामे तपासलेले आहेत त्यामध्ये २५ टक्केच काम तपासणीचे बाकी आहे. कामे झाली का नाहीत या संदर्भात रेकॉर्ड कृषी खात्याकडे उपलब्ध नाही पोलीस यंत्रणे कडून संपूर्णपणे दुर्लक्ष आहे. जलयुक्त शिवार योजनेमध्ये दहा कोटी पेक्षा जास्त भ्रष्टाचार झाला असून कामे न करताच बिले देण्यात आलेले आहेत ,साडेतीन कोटी पेक्षा जास्त वसुली दक्षता पथक कृषी विभाग यांनी आदेश पारित केलेले असून आजतागायत अधिकारी यांच्याकडून वसुली चालू आहे. परंतु एकही गुत्तेदारानी वसुली भरलेली नाही व अटकेची कारवाई झाली नाही दुसऱ्या तिसऱ्या चौथ्या टप्प्यातील गुत्तेदारावर आज पर्यंत एफ आय आर दाखल झालेले नाही.मा उपलोकआयुक्त यांचे आदेश असूनही कारवाई परळी शहर पोलीस स्टेशन कडून व कृषी खात्याकडून केली जात नाही ही बाब मा. उपलोक आयुक्त साहेबांच्या समोर सुनावणीच्या वेळेस निदर्शनास आणून दिल्यानंतर मा. उपलोक आयुक्तनी तात्काळ अधिकारी व गुत्तेदारांना अटक करा, गुत्तेदारावर एफआयआर दाखल करा त्यांच्या मालमत्तेवर बोजा नोंद करण्याचे आदेश पारित करून एक महिन्याच्या आत कृषी आयुक्त पुणे बीड जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक बीड यांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याची माहिती काँग्रेसने ते वसंत मुंडे यांनी दिली. परळी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत राजकीय हस्तक्षेपामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात असून शासन स्तरावरच्या चौकशीही यंत्रणेमार्फत दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.



# महसुल विभागात निवडणूक विभाग संभाळने म्हणजे जिकिरीचे काम-तहसिलदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

समाजात काम करतांना सर्वात जास्त सर्वसामान्य लोकांचे कामे हे महसूल विभागात असतात आणि निवडणूक विभागात काम करून लोकांचे मने जिंकणे म्हणजे जिक्रीचे काम असल्याचे प्रतिपादन तहसिलदार वैशाली नेमगोंडा पाटील यांनी केले.

आष्टी तहसिल कार्यालयात अव्वल कारकून म्हणून कार्यरत असलेले राजाराम पवार यांचा सोमवार दि.३० रोजी सायंकाळी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या सेवानिवृत्त कार्यक्रमात तहसिलदार पाटील बोलत होत्या.यावेळी नायब तहसिलदार बाळदत्त मोरे,नायब तहसिलदार प्रकाश शिरशेवाड, राजाराम पवार सपत्नीक व्यासपीठावर उपस्थित होते.पुढे बोलतांना पाटील म्हणाल्या,महसूल विभागात काम करत असताना खुप जिक्रीचे काम असून,निवडणूक विभागात काम करणे म्हणजे काटेरी कसरत आहे.आणि ही काटेरी खुर्ची पवार यांनी व्यशस्वीपणे सांभाळली असल्याचेही तहसिलदार पाटील यांनी सांगितले.राजाराम पवार म्हणाले, पान ३ वर



# सत्ताविस वर्षांपासून संजयनगरात विनावर्गणी दुर्गात्सव होतो साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**




संजयनगर येथील जयभवानी ग्रुपची बैठक आयोजित करण्यात आली होती

### जयभवानी दुर्गात्सव समीतीच्या अध्यक्षपदी अमोल काबळे कार्याध्यक्षपदी मगन परदेशी

यावेळेस जयभवानी दुर्गात्सव समितीच्या अध्यक्षपदी अमोल काबळे तर उपाध्यक्ष सतिष पवार, सचिव प्रकाश बर्डे,सह सचिव अमोल हादगुले,सघटक राजेंद्र गरड,कार्याध्यक्ष मगन परदेशी, कोषाध्यक्ष प्रकाश उपळकर, यांची जयभवानी दुर्गात्सव समीतीचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.उपनगराध्यक्ष पान ३ वर

# बाळासाहेब पवार यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

प्रभाकर सदाशिवराव पवार यांचे ज्येष्ठ चिरंजीव तथा युवा शक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व घिसाडी समाज बीड अध्यक्ष बाळासाहेब पवार यांचे दुःखद निधन झाले.



पेठ बीड मधील युवा शक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री बाळासाहेब प्रभाकर (आबा) पवार यांचे दिनांक ३०/०९/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, त्यांचा अंत्यविधी अमरधाम जुना मोंढा येथे दिनांक ०१/१०/२०२४ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

# साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान द्या; धारूरमध्ये मोर्चा

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर तालूक्यातील सकल मातंग समाज बा्धव व मानवी हक्क अभियानचे वतीने साहीत्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या्ना भारताचा सर्वोच्य भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करावे या मागणी साठी तहसील कार्यालया वर मोर्चा काढण्यात आला तहसीलदारला निवेदन देण्यात आले.

साहीत्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या्ना भारत सरकारणे सर्वोच्य असणारी देशातील भारतरत्न हा सन्मान देऊन त्यांचा गौरव करावा या मागणी साठी सकल मातंग समाज व मानवी हक्क अभियान यांचे वतीने तहसील कार्यालया वर मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातूत्र या मोर्चा सुरू करून घोषणा देत हा मोर्चा पान ३ वर




# जो पक्ष आपल्याला प्रतिनिधित्व देणार नाही त्याच्याविरुद्ध बंड करा

## माळी सत्ता संवाद दौऱ्यात ॲड.सतिष शिंदे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

माळी समाजाने यापुढे जो पक्ष आपल्याला सत्तेत प्रतिनिधित्व करण्याची संधी देत नाही त्यांच्याविरुद्ध बंड केले पाहिजे. असे आवाहन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड. सतीश शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील माळी समाज असलेल्या गावात दौरा प्रसंगी बोलताना केले. एडवोकेट सतीश शिंदे यांनी सोमवारी बीड जिल्ह्यातील हिवरशिंगा, लिंबारुई राजुरी नवगण बीड , म्हाळस जवळा ,नागापुर खुर्द, नाळवंडी, वडवणी तेलगाव , पात्रूड, माजलगाव, खरात आडगाव, किटी आडगाव, माली पारगाव आदी ठिकाणी दौरा केला.

माळी समाजाला लोकसंख्येनुसार ग्रामपंचायत ,पंचायत समिती ,जिल्हा परिषद , महानगरपालिका , नगरपरिषद, आमदार या सर्वच ठिकाणी सत्तेत वाटा मिळावा यासाठी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड.सतिष शिंदे महाराष्ट्रभर दौरे करत आहेत .समाजाला जागृत करण्यासाठी हे दौरे आयोजित केले आहेत.

संपूर्ण देशामध्ये आणि महाराष्ट्रात माळी समाज मोठ्या संख्येने आहे. प्रत्येक जिल्हा ,तालुका आणि गावांमध्ये माळी समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने पान ३ वर



# सिताराम क्षीरसागर यांची सामाजिक न्याय सेलच्या तालुकाध्यक्षपदी निवड



माजलगाव । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते सिताराम क्षीरसागर यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षाच्या सामाजिक न्याय सेलच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

या पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा बाजार समिती सभापती जयदत्त नरवडे आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते व माजी सभापती जयसिंग पान ३ वर

# घरकुलाच्या थकीत हप्त्यासाठी लाभार्थ्यांचा माजलगाव पंचायत समितीवर मोर्चा

**माजलगाव । प्रतिनिधी**

विविध घरकुल योजनांचे थकीत हप्ते अदा करावे व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शेतमजुर युनियन लाल बावटाच्या वतीने दि ३० सप्टेंबर सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता माजलगाव पंचायत समिती कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढण्यात आला.या मोर्चाचे नेतृत्व शेतमजुर युनियनचे नेते कॉमरेड दत्ता डाके यांनी केले.

पंतप्रधान आवस योजनेस इतर अनेक घरकुल योजना सरकारने जाहीर केल्या. २०२२ पर्यंतच सर्वांना घरे देण्याची घोषणा मोदी सरकारने केली. मात्र २०२४ साल संपत आले तरीही सर्वांना घरे मिळत नाहीत.केवळ पहिला हप्ता पंधरा हजार रुपये लाभार्थीच्या खात्यावर वर्ग केले. तेवढ्या रकमेतच इतरांचे उदाहरण वारी



करून लाभार्थ्यांनी घर पूर्ण केले.मात्र अजूनही पुढचे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे तालुक्यातील लाभार्थ्यांनी माजलगाव पंचायत समितीवर मोर्चा काढला.सर्व लाभार्थ्यांचे थकीत बिल आदा करावे, लाभार्थ्यांना केरळ राज्य सरकार प्रमाणे घरकुल बांधण्यासाठी सात लाख रुपये द्यावे,या पान ३ वर

# जगदंबा माता नवरात्र महोत्सवाच्या अध्यक्षपदी सचिन मस्के यांची निवड

वडवणी प्रतिनिधि,

प्रतिवर्षा प्रमाने याही वर्षी वडवणी शहरातील गोपालनगर मध्ये जगदंबा माता नवरात्र मोहत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.गोपालनगरच्या सर्व जगदंबा माता भक्तांची बैठक संपन्न झाली या बैठकी मध्ये जगदंबा माता नवरात्र मोहत्सव गोपाल नगर च्या अध्यक्ष पदी सचिन मस्के यांची एकमताने निवड करण्यात आली.

सविस्तर वृत आसे की वडवणीच्या गोपाल नगर मध्ये गेल्या अनेक वर्षापासुन जगदंबा माता नवरात्र मोहत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो याही वर्षी नवरात्र महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची रुपरेषा रोज रात्री जगदंबा मातेच्या गितांचा कार्यक्रम व विविध सामाजिक उपक्रम घेतले जातात.तसेच होम मिनिस्टरचा सुद्धा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.मंडळाच्या पदाधिकार-यांनी यावर्षीच्या नवरात्र मोहत्सवाचे नियोजन अंत्यात भव्य स्वरुपात करण्याची तयारी सुरु केली आहे.धार्मिक , सांस्कृतिक,आणी सामाजिक कार्यक्रमाचा समावेश आसलेल्या पान ३ वर



# गोवंशाच्या हाडा-मासाची वाहतूक करणारा आयशर पोलिसांनी पकडला

**जालना । प्रतिनिधी**

**मुंबई येथुन जालनामार्गे हैदराबाद दिशेने गोवंशाच्या हाडा-मासाची वाहतुक करणारा आयशर पोलिसांनी पाठलाग करून पकडला याप्रकरणी कदीम जालना पोलिसांनी ताब्यात घेतला असून, मुद्देमालासह आयशर जप्त केला आहे. याप्रकरणी दोघा जणांविरुध्द कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, एका आयशरमधुन (एमएच १३ सीयु १६२२) गोवंशाच्या हाडा-मासाची वाहतुक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यांनी या आयशरचा पाठलाग करून अंबड चौफुलीजवळ अडविले असता



आयशरमधुन दुर्गंधी येत होती. त्यामुळे पोलिसांनी आयशरच्या चालकाकडे विचारणा केली असता त्याने आयशरमध्ये हाडे आणि मास असल्याचे सांगितले. याबाबत कदीम जालना पोलीस स्टेशनचे फौजदार ज्ञानदेव नागरे यांच्यासह श्री. मोरे, श्री. बमणावत, श्री. चव्हाण आणि सदाशिव राठोड यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. आयशर चालक मोहमद ताह्या इम्तियाज अन्सारी आणि साथीदार दिलसर अक्तरअली हाश्मी याला ताब्यात घेतले. त्यानंतर आयशरची झडती घेतली असता अळ्या लागलेले कुजलेले मास आणि हाडे त्या गाडीमध्ये आढळून आले. याप्रकरणी आयशर चालक आणि साथीदार अशा दोघांविरुध्द भारतीय न्याय संहिता २७२, २८१, १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहे

# होम मिनिस्टर कार्यक्रमास बाराव्या दिवशीही महिलांचा प्रचंड उत्साह कायम

## धांडे गल्लीतील रस्ता महिलांच्या सहभागाने फुलून गेला

बीड । प्रतिनिधी

गेल्या १२ दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची लोकप्रियतेची महिलांमध्ये क्रेझ निर्माण झाली आहे. पैठणी जिंकण्यापेक्षा चार भिंतीच्या आतील जीवन काही क्षण स्वतःच्या आनंदासाठी, दसऱ्याच्या घर कामाच्या व्यस्ततेतुनही या कार्यक्रमाचा आंनद घेण्यासाठी महिला दिवसेंदिवस या कार्यक्रमास प्रचंड उत्साहाने सहभागी होत आहेत.हिरीरीने सहभागी होत आहेत.



धांडे गल्ली प्रभाग क्रमांक १४ धांडे गल्ली चौक या ठिकाणी आज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

काकू - नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या कार्यक्रमाची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे.हजारोच्या संख्येने महिला या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रतिभा विनोद धांडे, सौ.शकुंतला बद्रीनाथ शिंदे,सौ.यमुना लक्ष्मण सुस्कर,सौ.वर्षा लहू बागलाने,सौ.स्वाती सदाशिव धांडे,महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ. जयश्रीताई विधाते,माजी सभापती सौ.उषाताई सरवदे,सौ.प्रेमलताताई चांदणे, सौ.किर्तीताई पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राज्यातील सहकार वाढून तो समृद्धीकडे जायला हवा

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ :कैलास कोद्रे, तुकाराम गुजर यांना पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनचा जीवन गौरव पुरस्कार प्रदानपुणे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि. (महाराष्ट्र) च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

पुणे : महाराष्ट्राच्या सहकाराचा गौरव देशात केला जातो. सहकार हा महाराष्ट्राचा प्राण आहे. राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या ही सहकाराशी जोडली गेलेली आहे. त्यामुळे सहकार वाढून तो समृद्धीकडे जायला हवा. यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया, देशाचा सहकार आणि राज्य यांच्यातील समन्वय साधण्याचे काम सरकारच्या माध्यमातून यापुढील काळात केले जाईल, अशी ग्वाही सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

सहकार व बँकिंग क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिल्याबद्दल पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. (महाराष्ट्र) तर्फे सन २०२२-२३ वर्षासाठी पुणे कँन्टोमेंट बँकेचे अध्यक्ष कैलास कोद्रे आणि सन २०२३-२४ वर्षासाठी प्रेरणा सहकारी बँक थेरगावचे संस्थापक संचालक तुकाराम उर्फ भाऊसाहेब गुजर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.केंद्र सरकारमध्ये सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचाही यावेळी विशेष सन्मान झाला. शिवदर्शन येथील राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल साहित्य सम्राट तेंडुलकर सभागृह येथे हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, तर रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक सतिश मराठे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सह. प्रबंधन संस्थानच्या निदेशक डॉ.हेमा यादव आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबईचे प्रशासक विद्याधर अनास्कर,असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.सुभाष



मोहिते, उपाध्यक्ष ॲड.साहेबराव टकले, सुनिल रुकारी, निलेश ढमढेरे, डॉ. प्रिया महिंद्रे, बाळकृष्ण उंद्रे, मंगला भोजने मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके उपस्थित होते.

ज्या बँकांनी शून्य टक्के एन.पी.ए. राखला, त्या बँकांचा गौरव कार्यक्रमात करण्यात आला. असोसिएशनने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये ज्या बँकांनी जास्तीत जास्त सहभाग घेतला, त्या बँकांना देखील यावेळी सन्मानित करण्यात आले.सी.ए. मिलिंद काळे यांची नॅफकॅबचे उपाध्यक्ष पदी , डॉ अनिल कारंजकर यांची पुणे विद्यापीठाच्या विखे पाटील अध्यासनाचे प्रमुख म्हणून नेमणूक झाल्याबद्दल तर प्रसाद पाटील केंद्रीय सहकार निबंधक कार्यालयात सल्लागार म्हणून नियुक्ती झाल्यानबद्दल विशेष सन्मान यावेळी झाला. प्रवीण दरेकर म्हणाले, महाराष्ट्राला सहकाराचा मोठा वारसा आहे. परंतु सहकारी बँकेच्या अनेक गोष्टी रिझर्व बँक ऑफ इंडियापाशी येऊन थांबतात. रिझर्व बँक ऑफ इंडिया समजून घेत नाही तोपर्यंत अडचणी सुटणार नाहीत. महाराष्ट्रात सहकाराचे जाळे आहे. छोट्या बँकांची गरज खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात आहे. त्यामुळे या बँकांना अडचणीत असतानाच मदत करा. सहकारी बँकांना ताकद देण्याची आवश्यकता आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अनिल कवडे म्हणाले, देशातील नागरी सहकारी बँकेच्या एक तृतीयांश बँका या महाराष्ट्रात आहेत. सहकारी तत्त्वांवर बँक उभ्या करताना ज्ञान मिळवून त्या ज्ञानाचा योग्य वापर केला पाहिजे. सहकारी बँकांमध्ये काम करताना आपण सर्वज्ञ नाहीत बऱ्याच गोष्टी आपल्याला शिकायच्या आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. केवळ प्रशिक्षण देऊन उपयोग नाही तर ग्रहण करण्याची इच्छाशक्ती देखील पाहिजे.सुभाष मोहिते म्हणाले, नागरी सहकारी बँकांच्या अडचणी मांडणे आणि त्या कमी करण्याचे प्रयत्न पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने सातत्याने केले जाते. सहकारी बँकांसाठी सरकार सकारात्मक असते परंतु आरबीआयचे धोरण बघता ते नकारात्मक आहेत का असे वाटते. सहकारी बँकाना समजून घेण्याची आणि त्यांना सहकार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# अध्यात्माच्या माध्यमातून आनंदी निरामय जीवनाची अनुभूती मिळवा !

## डॉ. सोमवंशी यांचे ज्येष्ठांना मार्गदर्शन

पुणे । प्रतिनिधी

निरामयता शरीराशी निगडीत आहे आणि आनंद हा मनाशी निगडीत आहे तेंव्हा या दोन्ही गोष्टी प्राप्त करण्यासाठी सत्कर्म करीत रहा , इतरांना बदलायच्या भानगडीत न पडता स्वतःला बदला , सत्संग करा, अध्यात्माकडे वळा असे प्रतिपादन डॉ. विलास सोमवंशी यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित निरामय आनंदी जीवन या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार आणि




उपाध्यक्षा शकुंतला शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात रविवार दि. २९ रोजी हा कार्यक्रम झाला. आपल्या व्याख्यानात डॉ. सोमवंशी यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना अध्यात्म आणि आरोग्य यांची योग्य सांगड घालून सुखी जीवनाचे मर्म समजाऊन सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला असोसिएशनचे सदस्य नीता गुप्ता, सुरेखा पाटील, शशिकांत कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, उषा भागवत , अशोक येळंमकर, शोभा पोरवाल यांनी कविता आणि गाणी सादर केली.

प्रास्ताविक डॉ.सुभाष पवार यांनी केले. सुत्रसंचलन निर्मला कासार यांनी केले तर सखाराम ढाकणे यांनी आभार मानले.

# बारामतीतील भंगार व्यावसायिकाचे अपहरण करणारी टोळी जेरबंद

बारामती । प्रतिनिधी

पोलिस असल्याची बतावणी करत बारामतीतील एका भंगार व्यावसायिकाचे अपहरण करत त्याला लुटणा-या टोळीतील सहाजणांपैकी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली. बारामती तालुका व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. या कारवाईत दोन गावठी पिस्तुलासह २ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



संतोष लक्ष्मण भंडलकर (वय ४२, रा. पणदरे, ता. बारामती), सुरेश अशोक राखपसरे (वय ३३, रा. कुंजीरवस्ती, मांजरी, ता. हवेली), शेखर सुभाष शिंदे ( वय ३२, रा. सांगवी, ता. बारामती), सूरज शंकर मदने (रा. माळेगाव, ता. बारामती, मूळ रा. सगोबाचीवाडी, पणदरे, ता. बारामती), हरीभाऊ बबन खुडे व अशोक गणपत बनसोडे (दोघे रा. कुंजीरवस्ती, मांजरी, हवेली) अशी आरोपींची नावे आहेत.

सोलापूरकडे जाण्याच्या तयारीत असलेल्या या आरोपींकडे सखोल चौकशी केली असता ते सांगोला-जत मार्गावरील शेगाव येथील एका सोनार व्यावसायिकास लुटण्यासाठी जात असल्याची माहिती मिळाली. आरोपी सुरज मदने याने ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा केल्याचे उघडकीस आले. त्याच्या राहत्या घरासमोर हा ट्रॅक्टर आढळून आला.

सूरज मदने हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर सातारा जिल्ह्यातील लोणंद, वाठार, भुईंड, फलटण, सातारा शहर, पुणे ग्रामीणमध्ये यवत, बारामती तालुका, बारामती शहर पोलिस ठाण्यात एकूण १५ गुन्हे दाखल आहेत. तो ट्रॅक्टर चोरीतील मास्टर आहे. इतर आरोपींवरही प्रत्येकी दोन-तीन गुन्हे दाखल असून हे सर्व रेकॉर्डवरील आरोपी आहेत.

बारामती तालुका पोलिस ठाण्यात याप्रकरणी अपहरण, मारहाणीसह, शस्त्र अधिनियमानुसार अनोळखींविरोधात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यातील फिर्यादी कुतुबुद्दीन सुभेदार शहा (वय ४०, रा. स्प्रिंग व्हिलेज, तांदूळवाडी, बारामती) यांचे वंजारवाडीत भंगार खरेदी-विक्रीचे दुकान आहे. तेथून दि. २३ सप्टेंबर रोजी त्यांचे अपहरण करण्यात आले होते. ते दुकानावर असताना चार अनोळखी लोक पांढऱ्या रंगाची आय-२० कार विक्रीसाठी घेवून आले. ही कार विक्री करायची असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु कारला नंबर प्लेट नसल्याने फिर्यादीने त्यांना नकार दिला. त्यानंतर आरोपींनी पोलिस असल्याची बतावणी करून त्यांना कारमध्ये बळजबरी बसवले. त्यांच्या जवळील मोबाईल व आठ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतली. 'तू चोरीचा माल खरेदी केला आहे. १५ लाख रुपये दे नाही तर तुला भिगवण पोलिस स्टेशनला घेवून जावू असे सांगितले. फिर्यादीने आरडाओरडा केल्यावर एकाने पिस्तुलाचा धाक दाखवला. त्यांना दौंड-नगर रोडने चिखली गावाजवळील एका पेट्रोलपंपावर सोडून देण्यात आले.'

या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी तीन पथके तयार करण्यात आली. फिर्यादीकडून आरोपींचे, कारचे वर्णन मिळविण्यात आले. ज्या रस्त्याने त्यांना नेण्यात आले होते, त्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासण्यात आले. गोपनीय माहितीनुसार ही कार संतोष भंडलकर वापरत असल्याचे समजले. त्यानुसार तो साथीदारांसह सोलापूर बाजूकडे जात असताना हिंगणगाव येथे त्याला ताब्यात घेण्यात आले.त्याच्याकडून अन्य आरोपींची नावे निष्पन्न झाली. गुन्ह्यात वापरलेली कार (एमएच-१२, जीव्ही ८३८३) ही ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणात भंडलकर, राखपसरे व शिंदे या तिघांना ताब्यात घेण्यात आले. गुन्ह्यात वापरलेली दोन पिस्तुलेही हस्तगत करण्यात आली

# पीएमआरडीए हद्दीत १० अग्निशमन केंद्र मंजूर



पुणे, – पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी होत होती. अखेर प्राधिकरणाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दौंड, पुरंदर, मुळशी, शिरुर आणि खेड या या तालुक्यात प्रत्येकी एक तर, मावळमध्ये दोन आणि हवेली तालुक्यात तीन असे एकूण १० अग्निशमन केंद्र मंजूर करण्यात आले आहे.

पीएआरडीएच्या हद्दीत ८१४ गावांचा समावेश होतो. प्राधिकरणाच्या हद्दीत औद्योगिक कंपन्या अनेक आहेत. तसेच औद्योगिक वसाहतीही आहेत. याचसह मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यामुळे अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे. जर एखादी दुर्घटना घडली तर पुणे , पिंपरी चिंचवड शहरातून अग्निशमन केंद्रांतून गाड्या बोलवाव्या लागतात. अंतर जास्त असल्याने या गाड्या पोहचण्यास उशीर लागतो. त्यामुळे प्राधिकरणाच्या हद्दीत अग्निशमन केंद्र स्थापन करण्याची मागणी होत होती.

पीएमआरडीए हद्दीतील ३४ जागांवर या केंद्रांसाठी आरक्षण टाकण्यात आले. त्यातील दहा जागा निश्चिच करून तेथे अग्निशमन आणि व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी १५० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. यामध्ये अग्निशमन केंद्राची इमारत, कर्मचारी निवासस्थाने, वाहने आणि यंत्रसामुग्रीबाबत कामे करण्यात येणार आहे.

**तालुका – गाव**
**दौंड – केडगाव**
**शिरूर – शिक्रापूर**
**मावळ – कान्हे**
**पुरंदर – दिवे**
**मावळ – पाटण**
**मुळशी – म्हाळुंगे**
**खेड – येवलेवाडी**
**हवेली – वडाचीवाडी, औताडे-हांडेवाडी , मांजरी–वडाचीवाडी**



# इंदापुरात गोळीबार, भर रस्त्यावर तीन राऊंड फायर, एकजण गंभीर जखमी

पुणे : बारामतीमधील हत्येची घटना ताजी असतानाच आता इंदापुरात अज्ञाताने एकावर गोळीबार केला आहे. या गोळीबारात एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळतेय. राहुल चव्हाण असं जखमी झालेल्या व्यक्तीचं नांव आहे. तो इंदापूर तालुक्यातील शिरसोडी गावचा असल्याची माहिती मिळते.

इंदापुरात तीन राऊंड फायर झाले असून त्यामध्ये राहुल चव्हाण गंभीर जखमी आहे. ही घटना घडताच इंदापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी जखमीला तातडीने खाजगी रुग्णालयात उपचार दाखल केलं. एक अज्ञात व्यक्ती दुचाकीवरून आली त्याने तीन ते चार राऊंड फायर केले. त्यापैकी तीन राऊंड समोरील व्यक्तीला लागले आणि यात ती व्यक्ती गंभीर जखमी आहे.

बारामतीमध्ये एका कॉलेजमध्ये विद्यार्थ्याची कोयत्याने हत्या केल्याची घटना घडल्यानंतर इंदापुरातही गोळीबार झाल्याने सर्वत्र भीतीचं वातावरण आहे. इंदापूरमधील एका महाविद्यालयाच्या समोर सायंकाळी सहा ते साडे सहाच्या दरम्यान ही घटना घडली. या गोळीबारामागचे कारण अद्याप स्पष्ट झालं नाही.

# येवलेवाडी काच कारखान्यात घडलेल्या दुर्घटने-प्रकरणी मालकासह पाच जणांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा येथील येवलेवाडीमध्ये दिनांक २९ सप्टेंबर रोजी काच कारखान्यात मोठी दुर्घटना घडून चार कामगारांचा मृत्यू झाला. तर अजूनही दोघेजण गंभीर जखमी आहेत. या प्रकरणी आता या कारखान्यातील कारखाना मालकासह पाचजणांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा पोलिसांनी दुर्घटनेस जबाबादार असल्याप्रकरणी तसेच सुरक्षाविषयक कामगारांची काळजी किंवा उपाययोजना न करण्याबाबत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




या प्रकरणी याबाबत दयानंद ज्ञानदेव रोकडे (वय ३६, येवलेवाडी) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. येवलेवाडी (झींपिश) येथे दुपारी दिड वाजेच्या दरम्यान हा अपघात घडला. इंडिया ग्लास सोल्यूशन्स या काचेच्या कारखान्यातून गृहप्रकल्प आणि विविध व्यावसायिक कार्यालयांसाठी काचा पुरवल्या जातात. रविवारी कच्चा मालाच्या ट्रकातून काचा उतरवताना त्याला बांधण्यात आलेला पट्टा तुटला आणि कामगारांच्या अंगावर दोन टन वजन असलेल्या काचांचे तुकडे पडले.

यामध्ये सहा कामगार अडकले होते. अग्निशमन दलाने या कामगारांना बाहेर काढले परंतु, यामध्ये (झींपिश) चार कामगारांचा मृत्यू झाला. चार कामगार जखमी झाले असून दोन जण अजूनही गंभीर जखमी आहेत.

या प्रकरणी कारखान्याचे मालक हुसेन तय्यबरअली पिठावाला (वय ३८, रा.कोंढवा), हातीम हुसेन मोटारवाला (वय ३६, रा. येवलेवाडी, कोंढवा), गाडी मालक संजय धुळा हिरवे (वय ३४, रा. कलंबोळी), ठेकेदार सुरेश उर्फ बबन दादू चव्हाण, गाडी चालक राजू दशरथ रासगे (वय ३०, कळंबोली) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.अमित शिवशंकर कुमार (वय २७ वर्ष), धर्मेंद्र सत्यपाल कुमार (वय ४०), विकास सरजू प्रसाद गौतम (वय २३) आणि पवन रामचंद्र कुमार (वय ४४ , येवलेवाडी) या कामागरांचा मृत्यू झाला. तर जगतपाल संतराम सरोज (वय ४९), मोनेश्वर कुली (वय ३४), पिंटू नवनाथ इरकल (वय ३०) तसेच फिर्यादी दयानंद रोकडे देखील जखमी झाले आहेत.

# रोटरॅक्ट क्लबतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

पुणे । प्रतिनिधी

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या पुणे विद्यापीठ शाखेच्या शिशुविहार प्राथमिक शाळेत रोटरॅक्ट क्लब बाणेर तर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप झाले. क्लबचे अध्यक्ष दैविक कारिया याच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून यंदाच्या गणेशोत्सवात क्लबच्या सदस्यांतर्फे सर्वत्र देवदर्शनासाठी आलेल्या नागरिकांना पैसे, मिठाई किंवा फळ यापेक्षा शालेय साहित्य देण्याचे आवाहन केले होते. नातेवाईक, मित्रपरिवार, रहिवासी सोसायटी, गणेशोत्सव मंडळे आदी ठिकाणाहून सुमारे तीन हजार वह्या, पुस्तके व लिखाण साहित्य संकलित झाले. हे सर्व साहित्य रोटरॅक्ट क्लब सदस्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका विजया बराटे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वितरित केले. रोटरॅक्ट क्लब बाणेर आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ सेलेस्टिअल्स, रोटरॅक्ट क्लब ऑफ एसएसपीयू, रोटरॅक्ट क्लब ऑफ पिंपरी एलिट आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ ह्युमॅनिटसच्या संयुक्त विद्यमाने हे सर्व शालेय साहित्य संकलित झाले. याप्रसंगी अनुराग लुणावत, अनिकेत लुणावत, इशान सोनवणे, यश झुंबरे, मृणाल जोशी, कृष्णा लोखंडे आदी उपस्थित होते.

# पुण्यात सीबीआयची धाड, १० जणांना अटक; कॉल सेंटरवर छापे, लाखो रुपयांसह ३ लक्झरी कार जप्त

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय तपास यंत्रणा म्हणजेच सीबीआयने विविध राज्यातील ३६ ठिकाणी छापेमारी केली असून महाराष्ट्रातील पुणे (झींपिश) जिल्ह्यातही धाड टाकली




आहे. पुण्यात केलेल्या कारवाईत सीबीआयने १० जणांना अटक केली आहे. सायबर गुन्हेगारी नेटवर्क विरोधात केंद्रीय तपास यंत्रणेची ही मोठी कारवाई आहे. सीबीआयने पुण्यातून १०, हैदराबादमधून ५ आणि विशाखापट्टणम येथून ११ जणांना अटक केली आहे. त्यामुळे, सायबर फ्रॉड प्रकरणातील छापेमारीतून सीबीआयने एकूण २६ जणांवर अटकेची कारवाई केल्याचं स्पष्ट झालं आहे.

सीबीआयमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय संचालन विभागाने २४ सप्टेंबर रोजी ऑपरेशन चक्र-खखख च्या माध्यमातून सायबर फसवणुकीबाबत खटला दाखल केला होता. त्यानंतर, याप्रकरणी तपास सुरू केल्यानंतर गुरुवार सायंकाळपासून पुणे, हैदराबाद, अहमदाबाद आणि विशाखापट्टण येथील ३२ वेगवेगळ्या जागांवर छापा टाकण्यात आला आहे. पुण्यातील रिजेंट प्लाझा या ठिकाणी सुरू असलेल्या कॉल सेंटरवर ही छापेमारी करण्यात आल्याची माहिती आहे. सायबर नेटवर्कच्या माध्यमातून कॉल सेंटरमधील कामगारांचा या गुन्ह्यात समावेश असण्याची शक्यता आहे. तपासादरम्यान, विविध कॉल सेंटरमधून १७० जणांना ताब्यात घेतलं असून त्यांची चौकशी करण्यात येत आहे.

पुण्यासह हैदराबाद, अहमदाबाद, विशाखापट्टनम यासारख्या शहरातून २६ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच, घटनास्थळावरुन मोबाईल फोन, लॅपटॉपसह इतर इलेक्ट्रॉनिक सामग्री देखील जप्त करण्यात आली आहे. गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या कारवाईत ५८ लाख रुपयांची रोकड आणि ३ महागड्या गाड्या सुद्धा जप्त करण्यात आल्या आहेत.

# पोलीस असल्याची बतावणी करून वृद्ध व्यक्तीला लुटले

पुणे । प्रतिनिधी

पोलीस असल्याची बतावणी करून नकली ओळखपत्र दाखवून एका ६७ वर्षीय व्यक्तीचे सुमारे पावणेदोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना लोणावळा शहरातील जयचंद चौकात बुधवारी (दि. १८) सायंकाळी घडली.

हनीफ कादर खान (वय ६७, रा. हुडको कॉलनी, लोणावळा) यांनी लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका अनोळखी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हनीफ खान हे बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास फेरी मारत होते. ते जयचंद चौकातील अनिल स्टोअर्सजवळ आले असता त्यांच्याकडे काळ्या रंगाचे जॅकेट, काळी जिन्स पँट व डोक्यावर हेल्मेट परिधान केलेली एक अनोळखी व्यक्ती आली. खान यांना थांबवत आपण पोलीस असून दोन आरोपींना आम्ही अटक केली असून त्यांच्याकडे रोख रक्कम आणि पिस्तूल सापडले आहे. हनीफ खान यांची झडती घेत खान यांच्याकडील सोन्याचे दीड तोळा वजनाचे ब्रेसलेट, दीड तोळा वजनाच्या सोन्याच्या दोन अंगठ्या काढून घेत रुमालात ठेवा असे सांगितले. त्यानंतर ते दागिने घेऊन अनोळखी व्यक्ती पळून गेला. लोणावळा शहर पोलीस तपास करीत आहेत.

# रस्ता ओलांडताना दुचाकीच्या धडकेने तरुणाचा मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकीने धडक दिल्याने एका पादचारी तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना येरवड्यातील गुंजन चौक ते शास्त्रीनगर रस्त्यावर घडली. अपघातानंतर दुचाकीस्वार पसार झाला आहे.

दिनेश रामफेर कनोजिया (वय २९, रा. जयप्रकाशनगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत कनोजियाचा मित्र नूरमहम्मद अन्सारी (वय ३९, रा. येरवडा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून येरवडा पोलिस ठाण्यात अज्ञात दुचाकीस्वाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कनोजिया शनिवारी (ता. २८) रात्री साडेआठ वाजता शास्त्री रस्त्याने निघाले होते. गुंजन चौकाजवळ ब्ल्यू ग्रास कंपनीसमोर ते रस्ता ओलांडत होते. त्यावेळी भरधाव दुचाकीने कनोजिया यांना धडक दिली. या अपघातात कनोजिया गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले असून, दुचाकीस्वाराचा शोध घेण्यात येत आहे.